3743

शनि ग्रह

3743



A;9692
155 HO

लेखक- श्री बलूजी

भालचंद्र
ज्योतिर्विद्यालय,
पुणें

पुढील प्रकाशनें

(१) सुलभ पंचांग

(२) जातक-वल्लभ

(३) जन्म-कुंडली

Δ:9692 3743
155HO
Duttatreya, Ballabh
Sampattiyog.

Δ!9692
155 HO
3743

SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR
(LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

Please return this volume on or before the date last stamped
Overdue volume will be charged 1/- per day.

ॐ

भालचंद्र ज्योतिर्विद्यालयाचें द्वितीय पुष्प

संपत्तियोग

लेखक

श्रीवल्लभ दत्तात्रेय अवचट,

(सवाई म्हापणकर)

कार्याध्यक्षः— निरयन फलज्योतिषमंडळ,

प्रो. भालचंद्र ज्योतिर्विद्यालय व महाराष्ट्राची व्यापाराकडे घांव,

या पुस्तकाचे कर्ते.

किंमत २ रुपये ८ आणे

प्रकाशक

सौ. सुहासिनी श्रीवल्लभ अवचट

भालचंद्र ज्योतिर्विद्यालय, ६०९ सदाशिव पेठ, पुणें.

Δ:9692
155 H0

(सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन आहेत)

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY.
Jangamwadi Math, VARANASI,
Acc. No. ....3743....

मुद्रक

गोपाळ बळवंत जोशी

आनंद छापखाना,

१९६/४६ सदाशिव पेठ, पुणें २.

लेखकाचे दोन शब्द

माझें पहिलें पुस्तक "महाराष्ट्राची व्यापाराकडे धांव" प्रसिद्ध झाल्यानंतर त्या पुस्तकाचा गवगवा पुण्या-मुंबईत फार झाला, व केसरी-सारख्या महाराष्ट्राच्या प्रमुख वृत्तपत्रानें पुस्तकाचें परीक्षण करून उत्कृष्ट अभिप्राय दिला.

या पुस्तकाच्या पाठोपाठ लगेंच हें "संपत्तियोग" नांवाचें पुस्तक आपणांपुढें सादर करितां येईल असें वाटलें नव्हतें, कारण सद्यःपरिस्थितीचा विचार करितां हें पुस्तक प्रसिद्ध करणें किती अवघड आहे हें सांगून कळणार नाहीं. आपणांकडे अशी एक म्हण आहे कीं घर म्हणतें बांधून पहा आणि लग्न म्हणतें करून पहा. तसेंच म्हणावयाचें झाल्यास पुस्तक म्हणतें लिहून पहा. म्हणजे त्यांत किती व कशा अडचणी येतात तें समजेल. परंतु या सर्व अडचणी ज्यांच्या कृपेमुळें दूर झाल्या त्यांचें नांव माझ्या अंतःकरणाच्या हृदयपटलावर कोरून ठेवितों. व अशीच त्यांची कृपा मजवर अखंड राहो असें अंतःकरणपूर्वक इच्छितों.

राष्ट्राचें वैभव राष्ट्रांत असलेल्या संपत्तीवर होतें. शहराचें वैभव नगर रचनेवर, व्यापारावर, पवित्रपणावर अगर देवस्थानावर केल्यास कांहीं बावगें होणार नाहीं.

तद्वत, परमेश्वराच्या वैभवाची कल्पना कशी करणार! हें अफाट जग, अनंत तारे, ग्रह आणि होणारे शास्त्रीयचमत्कार यांवरून परमेश्वराच्या वैभवाची कल्पना करितां येईल.

परमेश्वरी वैभव दिग्दर्शक, नक्षत्रें, ग्रह, योग तारे यांचे मानवी जीवना

वर कसे परिणाम होतात. व कोणाला, किती संपत्ती मिळून सुखांत अगर दुःखांत राहतां येतें यांचें ज्योतिषशास्त्रदृष्ट्या या पुस्तकांत मार्गदर्शन केलें आहे.

संपत्ती मिळविण्याचे जे जे नानाविध मार्ग आहेत त्यांतील बऱ्याचशा मार्गांचें संशोधन करून व्यवहारांत दिसणाऱ्या गोष्टींची ज्योतिषशास्त्रदृष्ट्या या पुस्तकांत बरीच माहिती दिली आहे.

मी गेलीं २० वर्षे ज्योतिषशास्त्राचें अध्ययन करून, हजारों कुंडल्यांचें बारीक निरीक्षण करून धनयोगाचे जे विविध नियम संशोधिले आहेत त्यांतील कांहीं योग या पुस्तकांत दिलेले आहेत. त्यामुळें पुष्कळांना हें पुस्तक उपयुक्त होईल.

ज्योतिष हा वेदांती विषय आहे, तो समजण्यास फार कठीण आहे परंतु तो सोप्या भाषेंत व सर्वांस सहज समजेल त्या पद्धतींत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

या माझ्या कृतीचा वाचकांनीं जरूर अनुभव घेऊन पहावा व सूचना कराव्यात पुढील माझ्या पुस्तकांत त्यांचा जरूर विचार करीन.

भालचंद्र ज्योतिर्विद्यालय,
६०९ सदाशिव, पुणें.

श्रीवल्लभ

श्रीमंत शेट मुकुंदराव दादाजी धाकजी राणे

मॅनेजिंग डायरेक्टर

दादाजी धाकजी ऍण्ड कं. लिमिटेड-मुंबई.

अर्पणपत्रिका



महाराष्ट्राच्या उत्कर्षाचा एकमेव मार्ग

" महाराष्ट्र तितुका एक व्हावा । केंद्रें व्यापार क्वचीज करावा "

हें ब्रीदवाक्य डोळ्यांपुढें ठेवून—

ज्यांनीं:—दुसऱ्यावर अवलंबून न राहतां स्वतःच्या कर्तबगारीवर, महाराष्ट्राची व्यापाराकडे धांव यशस्वी करून, व्यापारी जगांत अग्रस्थान पटकविलें—

ज्यांनीं:—स्वतःच्या अविश्रांत परिश्रमानें, सतत दीर्घोद्योगानें, विलक्षण चिकाटीनें व्यापारांत धडाडी दाखवून महाराष्ट्रांत व्यापारी वृक्षाचें बीजारोपण केलें आणि हिंदुस्थानच्या चारही दिशेला व्यापारी केंद्रें निर्माण करून व्यापारपेठा हस्तगत केल्या व आपल्या मेसर्स दादाजी धाकजी ॲण्ड कंपनीचा सुवर्णमहोत्सव मोठ्या थाटामाटाने साजरा केला—

ज्यांनीं:—ईश्वरावर अढळ निष्ठा ठेवून, वाडवडिलांच्याविषयीं आदरबुद्धि बाळगून, आपल्या अवर्णनीय मातृभक्तीनें जगाला नवीन वळण घालून दिलें—

ज्यांनीं:—आपल्या बुद्धिचातुर्यानें, व्यापारांत व व्यवहारांत धर्मशास्त्राचें व ज्योतिषशास्त्राचें श्रेष्ठत्त्व स्वानुभवानें जगाला पटवून दिलें—

—अशा ज्योतिषशास्त्राभिमानी—

श्रीमंत दानशूर शेट मुकुंदरावजी दादाजी राणे

मॅनेजिंग डॉयरेक्टर मेसर्स दादाजी धाकजी ॲण्ड कं., लि., मुंबई.

यांना सप्रेम सादर

समर्पण

ॐ नमः शिवाय.

श्रीमहामाहेश्वरी, श्रीमहाकाली, श्रीमहालक्ष्मी, श्रीमहासरस्वत्यैनमः

भक्तजनांचें कल्याण करणाऱ्या, शुद्ध सोन्या-सारख्या तेजःपुंज अशा तेजस्वीरूपी, सुवर्णवस्त्र धारण करणाऱ्या, आणि नानाप्रकारच्या भूषणांनीं जिचें शरीर शोभते आहे अशा लक्ष्मी-देवतेला मी नमस्कार करतों.

सर्व प्रकारच्या बीजांनीं भरलेला सोन्याचा कलश व सुवर्ण कमल ती जगज्जननी आदि-शक्ति, भगवान् विष्णूच्या वामांकावर शोभणारी धारण करीत असते.

सौभाग्यदायक व सनातन अशा लक्ष्मीची मी स्तुति करितों. लक्ष्मी सर्व कामना सफल करणारी अतएव सर्व सुखाचें माहेरघर आहे.

हे लक्ष्मी, तुझ्याकडून प्रेरणा माझ्या मनाला

झाली, म्हणून मी तुझें नित्य स्मरण करितों. तुझी आज्ञा शिरसावंद्य समजून, हे देवी मी तुझ्या चरणीं लागतों.

हे श्रीमहालक्ष्मी, तूं सर्व प्रकारचें वैभव देऊन सुखविणारी आहेस, तसेंच तुझ्या कृपाप्रसादामुळें अखंड सौभाग्य व कल्याण आणि ज्ञान मनुष्याला प्राप्त होतें. म्हणून महासंपत्ति देणाऱ्या हे देवी, मी तुझी भक्ति करितों आणि तुला, माझ्या आराध्यदेवतेला, भक्तिभावानें नमस्कार करून संपत्तियोग लिहिण्यास प्रारंभ करितों.

अनुक्रमणिका

विषय	पृष्ठ
१ संपत्तीविषयीं विचार	१
२ प्रारंभीची माहिती	२
३ धनयोग	८
४ सांपत्तिक लाभ	२१
५ द्वादश लग्नाला धन देणारे ग्रह	२३
६ कोणत्या स्थानीं काय पहावें	२९
७ लाभस्थानीं असलेला ग्रह कोणाकडून द्रव्यप्राप्ति दर्शवितो	३४
८ व्यापारी–कारखानदार–स्वतंत्र धंदेवाईक	३४
९ निरनिराळ्या ग्रहांचे धंदे	३८
१० कॉन्ट्रॅक्टमध्यें फायदा कोणाला होतो ?	४१
११ गोचरींचे कोणते ग्रह धनयोगाला पोषक असतात	४२
१२ ग्रहांचा उदयकाल	४३
१३ सासऱ्याकडून धनप्राप्ति	४५
१४ स्त्रियांचेकडून धनप्राप्ति	४७
१५ शर्यती	४८
१६ लाटरी	५०
१७ दत्तकयोग	५२
१८ सट्टे आणि शेअर	५३
१९ लाभदायक दशा	५५
२० मृत्युपत्रान्वयें किंवा वारसहक्कानें धनप्राप्ति	५८
२१ सांपत्तिक अडचणी	५९
२२ यशापयश	६५
२३ धनसहम	६८
२४ ग्रहांचे सांपत्तिक योग	७०
२५ आर्थिक पत	७१
२६ कुंडली संग्रह	७३
२७ आभार	७६
कुंडल्या	७७

ॐ नमःशिवाय–

१ संपत्तीविषयीं विचार

कोणा माणसाजवळ हजारों रुपये असतील, कोणाजवळ लाखों रुपये असतील, कोणी कोट्यावधि रुपयांचा मालक असेल तर हीं सर्व माणसें संपत्तिमान आहेत असें कोणीही म्हणेल.

परंतु आपण संपत्तीची मोजदाद ज्या पैशानें करितों तो पैसाच फक्त संपत्ति, बाकी कांहींही संपत्ति नव्हे असें म्हणणें चुकीचें ठरेल. कारण कोणताही जिन्नस दिला असतां त्या जिनसांच्या मोबदल्यांत दुसरा कोणताही जिन्नस मिळाला तरी ती संपत्तीच आहे.

प्राचीन कालीं संपत्तीची मोजदाद जवळ असलेल्या घनधान्यावर, गुरांढोरांवर, जमीनजुमल्यावर करण्याची वहिवाट होती तशी आजही चालू आहे.

कोणताही हलका सलका जिन्नस संपत्ति देण्यास कारणीभूत होऊं शकेल. अगदीं घरांतील केरकचऱ्यापासून ते तहत दगड, धोंडा, माती, विटा, पाणी, धान्य, कापड, घरें, जनावरें, जमिनी, गुरेंढोरें, औषध असे अनेक जिन्नस घेतले तरी हे सगळे जिन्नस संपत्ति देण्यास कारणीभूत होतील, किंबहुना हे जिन्नस संपत्तीच आहेत हें नीट लक्ष्यांत ठेविलें पाहिजे.

एकाद्या माणसाची श्रीमंती दाखवावयाची झाल्यास त्याची मिळकत काय आहे वगैरे गोष्टी ज्या वेळीं सांगावयाच्या असतात त्यावेळीं त्याच्याजवळ असलेल्या जिनसांची मोजदाद न करितां त्याच्या संपत्तीची चटकन् कल्पना यावी म्हणून संपत्तिदर्शक चिन्ह योजण्याचा प्रघात आहे.

हा मनुष्य लक्षाधीश आहे, याची कोट्यावधि रुपयांची इस्टेट आहे म्हणजे त्याचेजवळ कोट्यावधि रुपये असतीलच असें नाहीं तर त्याच्या-

जवळच्या शेतापोतांवरून, घरादारांवरून, दाण्यागोट्यावरून, दागदागिन्यांवरून, कपड्यालत्त्यांवरून, गुरांढोरांवरून या सर्वांची म्हणून जी किंमत येईल ती दर्शविण्याचा प्रघात आहे.

म्हणून पैसा हाच संपत्ति नसून तो संपत्तिदर्शक चिन्ह आहे. किंवहुना देवघेव करण्यास सुलभ पडावें म्हणून त्यासाठीं पैसा हें योजलेलें एक साधन आहे.

ज्या गोष्टींमुळें मनुष्याचें वैभव वाढतें, ज्यामुळें मनुष्य ऐश्वर्यसंपन्न दिसतो, किंवा मानवीप्राण्याच्या ऐहिक सुखाच्या म्हणून ज्या ज्या गोष्टी आहेत त्या सर्व पैशानें मिळवितां येतात. आज तो पैसा मिळविण्याकरितां निरनिराळ्या माणसांचे नानातऱ्हेचे उद्योग चाललेले आपण पाहतों.

पैसा मिळविण्याचे प्रकार दोन. एक श्रमानें मिळविलेला पैसा, दुसरा विनाश्रमानें मिळविलेला किंवा आयता प्राप्त झालेला. तेव्हां श्रमानें वा विनाश्रमानें कोणा माणसाला किती पैसा कशामुळें मिळतो याचा ज्योतिषशास्त्रदृष्ट्या सविस्तर विचार करूं.

---

२ प्रारंभीची माहिती

पंचांग—पंचांग म्हणजे ज्यांत पांच अंगांचा समावेश केलेला असतो तें पंचांग. तीं पांच अंगें येणेंप्रमाणेः—तिथी, वार, नक्षत्रें, योग आणि करण हीं होत. हीं पांच अंगें ज्यांत दिलीं आहेत त्याला पंचांग असें म्हणतात.

तिथी—सूर्यचंद्र एका राशींत आल्यानंतर चंद्र हा जलद गतीनें पूर्वेस सूर्याचे पुढें जातो आणि या दोन ग्रहांत जेव्हां १२ अंश अंतर पडतें तेव्हां एक तिथी होते.

वार—सूर्य पूर्वेकडे उगवून पश्चिमेकडे मावळतो व पुन्हां पूर्वेकडे उगवतो. तेव्हां सूर्य उगवल्यापासून पुन्हां उगवेपर्यंत जो वेळ लागतो त्याला वार म्हणतात.

नक्षत्रें—पृथ्वी ज्या मार्गानें सूर्याभोंवतीं फिरते त्या मार्गाला क्रांतिवृत्त असें म्हणतात. हें क्रांतिवृत्त दीर्घवर्तुळाकार आहे व यावरच नक्षत्रें आहेत. हीं आपल्या जागेवरून कधींहि ढळत नाहींत, म्हणून यांना नक्षर तीं नक्षत्रें हें नांव यथार्थ आहे. नक्षत्रें हीं देवांचीं घरें आहेत.

योग—सूर्य चंद्र या दोघांच्या भ्रमणांची बेरीज ८०० कला झाली कीं योग होतो.

करण—सूर्याचे पुढें चंद्राला ६ अंश जाण्याला जो काळ लागतो त्याला करण म्हणतात. करण म्हणजे तिथीचा अर्धा भाग होय.

क्रांतिवृत्त—ग्रहांच्या सूर्याभोंवतीं फिरण्याच्या मार्गाला क्रांतिवृत्त म्हणतात. हें दीर्घवर्तुळाकार आहे. याचे ३६० अंश आहेत. याचेच समान १२ भाग पाडले म्हणजे एकेक भाग ३० अंशांचा होतो. याच एकेका भागाला मेष, वृषभ, मिथुन अशीं नांवें आहेत. या एका भागांत म्हणजे ३० अंशांत २$\frac{1}{4}$ नक्षत्रें येतात, म्हणजे एका नक्षत्रविभागांत १३ अंश २० कला येतात व एका नक्षत्राच्या $\frac{1}{4}$ विभागांत ३ अंश २० कला येतात. नक्षत्राच्या $\frac{1}{4}$ विभागाला चरण म्हणतात. ९ चरणांची एक एक राशी होते; व १२ राशींचे एक वर्तुळ होतें, यालाच क्रांतिवृत्त म्हणतात.

राशींचे स्वामी—क्रांतिवृत्ताचे जे बारा भाग पाडले आहेत त्या भागाला मेष, वृषभ, मिथुन अशीं राशींचीं नावें दिलीं आहेत. त्या १२ राशींत सिंह ही अत्यंत बलिष्ठ राशी आहे. ती राशी रवीनें घेऊन त्या राशीपासून पुढें ६ राशी म्हणजे सिंह ते मकरपर्यंतच्या राशी सूर्यानें घेतल्या व सिंह राशीच्या शेजारील राशी कर्क, ही रास चंद्रानें घेऊन त्याच्या-

मागील राशी ६ म्हणजे कुंभ राशीपासून कर्कराशीपर्यंतच्या राशी चंद्रानें घेतल्या व मग रवि-चंद्रानें आपल्याजवळील राशीपैकीं एकेक आपल्याला ठेवून बाकीच्या राशी बुध, शुक्र, मंगळ, गुरु, शनि या पांच ग्रहांना वाटून दिल्या. रवीनें बुध या ग्रहाला कन्या व चंद्रानें मिथुन राशी दिली. शुक्राला रवीनें तूळ व चंद्रानें वृषभ, मंगळाला रवीनें वृश्चिक व चंद्रानें मेष; गुरूला रवीनें धनु व चंद्रानें मीन, शनीला रवीनें मकर व चंद्रानें कुंभ राशी याप्रमाणें दिल्यानें ते ते ग्रह त्या त्या राशींचे मालक झाले.

कुंडलींत राशी नेहमीं आंकड्यानें दर्शवितात. उदा०—१ मेष, २ वृषभ, ३ मिथुन, ४ कर्क, ५ सिंह, ६ कन्या, ७ तूळ, ८ वृश्चिक, ९ धनु, १० मकर, ११ कुंभ, १२ मीन याप्रमाणें आतां जे ग्रह राशींचे मालक आहेत त्यालाच ग्रहांची स्वगृहें म्हणतात. म्हणून रवीचें स्वगृह सिंह, चंद्राचें स्वगृह कर्क. बुधाचीं स्वगृहें मिथुन व कन्या, शुक्राचीं स्वगृहें वृषभ व तूळ, मंगळाचीं स्वगृहें मेष व वृश्चिक, गुरूचीं स्वगृहें धनु आणि मीन व शनीचीं स्वगृहें मकर आणि कुंभ हीं होत. जन्मकुंडलींत ज्या घरांत जो आकडा असेल तो ज्या राशीचा द्योतक असेल त्या राशीचा जो मालक असेल तोच त्या घराचा मालक होतो. त्यालाच अधिपति, स्वामी, मालक असें म्हणतात.

लग्न :— इष्टकालीं क्रांतिवृत्त मार्गांतील जो बिंदू पूर्वक्षितिजावर उदय पावत असेल त्यालाच लग्न म्हणतात.

दशम :—इष्टकालीं क्रांतिवृत्तांतील जो बिंदु माध्यान्हवृत्तावर असेल तेंच दशम भावाचें स्थान होय. त्याला ख-स्वस्तिक म्हणतात.

कुंडली :—द्वादशग्रहात्मक चतुष्कोण आकृतीला कुंडली असें म्हणतात. कुंडली वर्तुलाकृती सुद्धां दाखवितात. मुख्य म्हणजे त्यांत १२ घरें असावीं हें होय. कुंडलींतील प्रत्येक गृहास भाव, क्षेत्र, भुवन, स्थान अशा संज्ञा आहेत.



शेजारील कुंडलींत १ लें, २ रें, ३ रें इत्यादि क्रमानें १२ स्थानें दाखविलीं आहेत. या १२ स्थानांच्या जागा नेहमीं अशाच कायम रहात असल्यामुळें हे स्थाननिदर्शक अंक कुंडलीमध्यें मांडले जात नाहींत. ज्या स्थानीं जी राशी येत असेल त्या राशीचा अंक त्या स्थानीं मांडतात. व जे ग्रह ज्या राशीमध्यें असतात ते त्या राशीच्या अंकांजवळ लिहिलेले असतात. लग्नाच्या राशीचा अंक कुंडलीच्या पहिल्या स्थानीं मांडलेला असतो.

स्थानांचीं नांवें :—जन्म-लग्नापासून म्हणजे प्रथम स्थानापासून द्वादश-स्थानापर्यंत प्रत्येक स्थानांच्या संज्ञा पुढीलप्रमाणें आहेत :—प्रथम भावाला तनुस्थान म्हणतात; दुसरें-धनस्थान; तिसरें सहज किंवा पराक्रम-स्थान; चवथें सुहृदस्थान आणि मातृस्थान; पांचवें सुतस्थान किंवा विद्या-स्थान; सहावें रिपुस्थान; सातवें जाया स्थान; आठवें मृत्युस्थान; नववें धर्मस्थान किंवा भाग्यस्थान; दहावें कर्मस्थान, पितृस्थान किंवा राजपद-स्थान; अकरावें आयस्थान किंवा लाभस्थान; बारावें व्ययस्थान, याप्रमाणें १२ भावांचीं निरनिराळीं नांवें आहेत.

केंद्रस्थानें—१ लें, ४ थें, ७ वें व १० वें हीं केंद्रस्थानें आहेत.

त्रिकोणस्थानें—५ वें व ९ वें या स्थानाला त्रिकोणस्थानें म्हणतात.

मारकस्थानें—२ रें व ७ वें ही मारकस्थानें आहेत.

शुभस्थानें—१ लें, ४ थें, ५ वें, ७ वें, ९ वें, १० वें, हीं शुभस्थानें आहेत.

मध्यमस्थानें—२ रें. ३ रें. ११ वें. हीं मध्यमस्थानें आहेत.

अशुभस्थानें—६ वें. ८ वें. १२ वें. हीं अशुभस्थानें आहेत.

शेजारील कुंडलीमध्यें पहिल्या घरांत २ हा आंकडा मांडिला आहे म्हणून ही वृषभ लग्नाची कुंडली आहे. पहिल्या घरांत जो आंकडा मांडतात तो आकडा ज्या राशीचा द्योतक असेल त्या राशीची अगर त्या लग्नाची ती कुंडली म्हणतात.

ज्या घरांत चंद्र असतो तो ज्या आंकड्यांत असेल तो आंकडा ज्या राशीचा द्योतक असेल तीच त्या माणसाची रास होय. आपल्या जन्म टिपणांत अगर जन्म-पत्रिकेंत लग्न कुंडली शेजारीच राशी कुंडली मांडण्याची चाल आहे.

वरील कुंडली ही वृषभ लग्नाची व चंद्र १२ आकड्यांत असल्यानें मीन राशीची आहे. दुसऱ्या घरांत ३ हा आकडा आहे. मेष राशीपासून तिसरी रास मिथुन व मिथुनेचा मालक बुध हाच दुसऱ्या घराचा मालक आहे. यालाच द्वितीयेश असें म्हणतात. तसेंच प्रत्येक ग्रहाचें समजावें.

ग्रहांचीं स्वगृहें, उच्च, नीच, व बलहीन स्थानें खालीलप्रमाणें:—

राशी	स्वगृह	उच्च	नीच	बलहीन
मेष	मंगळ	रवि १० अं.	शनि १० अं	शुक्र
वृषभ	शुक्र	चंद्र ३ अं.		मगळ
मिथुन	बुध			गुरु
कर्क	चंद्र	गुरु ५ अं.	मंगळ २८ अं.	शनि
सिंह	रवि			शनि
कन्या	बुध	बुध १५ अं	शुक्र २७ अं	गुरु
तूळ	शुक्र	शनि २० अं.	रवि १० अं.	मंगळ

राशी	स्वगृह	उच्च	नीच	बलहीन
वृश्चिक	मंगळ		चंद्र ३ अं.	शुक्र
धनु	गुरु			बुध
मकर	शनि	मंगळ २८ अं.	गुरु ५ अं.	चंद्र
कुंभ	शनि			रवि
मीन	गुरु	शुक्र ५७ अं.	बुध १५ अं.	बुध

ग्रहांच्या दृष्टी – प्रत्येक ग्रह आपल्या स्थानापासून सातव्या स्थानीं पूर्ण दृष्टीनें पाहतो. परंतु बहिर्ग्रह म्हणजे शनि, गुरु, मंगळ हे आणखी आपल्या स्थानापासून विशेष दृष्टीनें पाहतात.

शनि—आपल्या स्थानापासून ३ ऱ्या व १० व्या दृष्टीनें पाहतो.

गुरु—आपल्या स्थानापासून ५ व्या व ९ व्या दृष्टीनें पाहतो.

मंगळ—आपल्या स्थानापासून ४ थ्या व ८ व्या दृष्टीनें पाहतो.

ग्रहांचे शत्रू व मित्र.

ग्रह	मित्र	शत्रु	ग्रह	मित्र	शत्रु
रवि	गु. मं. चं.	श. शु.	गुरु	र. चं. मं.	बु. शु.
चंद्र	सूर्य बु.	रा.	शुक्र	श. बु.	रवि. चंद्र
मंगळ	र. चं. गु.	बु.	शनि	शु. बु.	रवि. चंद्र
बुध	र. शु.	चं.	राहू	श. बु. शु.	रवि. चं. मं.

सदरील पुस्तकांत जेवढ्या प्रारंभीच्या माहितीची जरूरी आहे तेवढी ऱ्या ठिकाणीं देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

३ धनयोग

माता निंदति नाभिनंदति पिता भ्राता न संभाषते ॥
भृत्यः कुप्यति नानुगच्छति सुतः कांताच नालिंगते ॥
अर्थप्रार्थन शंकया न कुरुते संभाषणं वै सुहृत् ॥
तस्माद् द्रव्यमुपार्जयेच्छृणु सखे द्रव्येण सर्वे वशाः ॥

मनुष्य निर्धन असेल तर त्याची आई निंदा करते, पित्याला संतोष वाटत नाहीं. बंधू मोकळेपणानें भाषण करीत नाहींत. सेवक (नोकर चाकर) क्रुद्ध असतात. पुत्र आस्थेत वागत नाहींत, स्त्री प्रेम करीत नाहीं. मित्र, स्नेही, आप्तवर्ग हे द्रव्याच्या मागणीच्या भीतीनें भाषण करण्याची टाळाटाळ करितात. तस्मात् द्रव्य संपादन करणें हें मनुष्यास युक्त होय; कारण द्रव्याचे योगानें कोणतीही गोष्ट साध्य होते. व सर्व लोक द्रव्याचे योगानें वश होतात.

कोणाही माणसाची कुंडली घेतली तरी तिच्यांत धनयोग झालेला असतो परंतु रोजच्या दिवसाला पोटापुरतें मिळण्याची मारामार पडते. या महिन्याचा पैसा त्या महिन्याला पुरत नाहीं; मग जवळ शिल्लक कोठली ? त्याला धनयोग म्हणतां येणार नाहीं.

आपला रोजचा व्यवहार संभाळून ज्याचा खर्च आद्यापेक्षां कमी आहे, व ज्याचेजवळ १५–२० हजार रुपये किंमतीचा ऐवज आहे अशालाच श्रीमंत म्हणतां येईल.

ज्यांचे कुंडलींत श्रीमंतीदर्शक योग झालेला आहे व समाज ज्याला श्रीमंत म्हणतो त्याच्या जन्मकुंडलींत कोणते योग कसे व्हावे लागतात, किंबहुना जे योग झाले म्हणजे मनुष्याला सांपत्तिक लाभ चांगले होतात ते योग खालीं दिलेले आहेत.

जन्म कुंडलींत नवमस्थान, लाभस्थान, द्वितीयस्थान, व पंचमस्थान हीं पत्तिदर्शक स्थानें आहेत.

तसेंच दशमस्थान, प्रथमस्थान, चतुर्थस्थान व सप्तमस्थान हीं स्थानें-ही मध्यम प्रकारचीं संपत्तीचा लाभ दर्शविणारीं स्थानें आहेत.

मेष, वृषभ, सिंह, तूला, धनु, कुंभ, ह्या संपत्तिदायक राशी आहेत.

सर्वच ग्रह संपत्तिदायक आहेत परंतु विशेषतः गुरु, शुक्र, बुध, व बलवान् चंद्र विशेष संपत्ति देतात.

(१) धनेश अष्टमांत असेल तर, मृत्युपत्रद्वारां, सट्टे, शर्यती, लॉटरी, भूमिगत द्रव्य, हुंडा, स्त्रियांकडून धन प्राप्त होतें.

(२) अष्टमेश धनांत असेल तर लाचलुचपतीनें, बेवारसी, सट्टे, लॉटऱ्या, गुप्तधन प्राप्त होतें.

(३) लग्नेश लग्नीं, पंचमेश पंचमांत, नवमेश नवमांत, एकादशेश धनांत किंवा एकादशांत असतां धनयोग होतो,

(४) लग्नेश लग्नीं, धनेश धनांत, नवमेश नवमांत, एकादशेश पंचमांत किंवा एकादशांत असतां धनयोग होतो.

(५) लग्नेश लग्नीं, धनेश धनांत, पंचमेश पंचमांत, एकादशेश नवमांत किंवा पंचमांत असतां धनयोग होतो.

(६) लग्नेश लग्नीं, धनेश धनस्थानीं, एकादशेश एकादशस्थानीं, आणि पंचमेश नवमांत किंवा पंचमांत असतां धनयोग होतो.

(७) लग्नेश लग्नांत, धनेश धनांत, पंचमेश पंचमांत किंवा एकादशांत, आणि नवमेश नवमांत असतां धनयोग होतो.

(८) लग्नेश लग्नीं, पंचमेश पंचमांत, धनेश धनांत आणि नवमेश नवमांत किंवा एकादशांत असतां धनयोग होतो.

(९) लग्नेश लग्नीं, धनेश धनांत, नवमेश नवमांत किंवा पंचमांत आणि एकादशेश एकादशस्थानीं असल्यास धनयोग होतो.

(१०) लग्नेश लग्नीं, पंचमेश पचमांत, एकादशेश एकादशांत आणि नवमेश धनांत किंवा एकादशांत असल्यास धनयोग होतो.

(११) लग्नेश लग्नीं, धनेश धनांत, पंचमेश पंचमांत, नवमेश नवमांत आणि एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(१२) लग्नेश लग्नीं, पंचमेश पंचमांत, नवमेश नवमांत, धनेश धनांत किंवा एकादशांत असतां धनयोग होतो.

(१३) लग्नेश लग्नीं, पंचमेश पंचमांत, एकादशेश एकादशांत, धनेश धनांत किंवा नवमांत असतां धनयोग होतो.

(१४) लग्नेश लग्नीं, नवमेश नवमांत, एकादशेश एकादशांत आणि धनेश धनांत किंवा पंचमांत असतां धनयोग होतो.

(१५) लग्नेश लग्नीं, धनांत किंवा पंचमांत, नवमेश नवमांत आणि एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(१६) लग्नेश लग्नीं, धनांत किंवा नवमांत, पंचमेश पंचमांत एकादशेश एकादशांत. असतां धनयोग होतो.

(१७) लग्नेश लग्नांत, धनांत किंवा पंचमांत, नवमेश नवमांत, एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(१८) लग्नेश धनांत किंवा नवमांत, पंचमेश पंचमांत आणि एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(१९) लग्नेश धनांत किंवा एकादशांत, पंचमेश पंचमांत, नवमेश नवमांत असतां धनयोग होतो.

(२०) धनेश धनांत, लग्नांत किंवा पंचमांत, नवमेश नवमांत, एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(२१) धनेश धनांत, लग्नांत किंवा नवमांत, पंचमेश पचमांत, एकादशेश एकदशांत असतां धनयोग होतो.

(२२) धनेश धनांत, लग्नांत किंवा एकादशांत, पंचमेश पंचमांत, नवमेश नवमांत, एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(२३) पंचमेश पंचमांत, लग्नांत किंवा धनांत, नवमेश नवमांत, एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(२४) धनेश धनांत, पंचमेश लग्नांत, पंचमांत किंवा नवमांत, एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(२५) धनेश धनांत, पंचमेश लग्नांत, पंचमांत किंवा एकादशांत नवमेश नवमांत असतां धनयोग होतो.

(२६) पंचमेश पंचमांत, नवमेश लग्नांत, नवमांत किंवा धनांत, एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(२७) धनेश धनांत, नवमेश लग्नांत, नवमांत किंवा पंचमांत, एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(२८) धनेश धनांत, पंचमेश पंचमांत, नवमेश नवमांत, लग्नांत किंवा एकादशांत असतां धनयोग होतो.

(२९) पंचमेश पंचमांत, नवमेश नवमांत, एकादशेश एकादशांत, लग्नांत किंवा धनांत असतां धनयोग होतो.

(३०) धनेश धनांत, नवमेश नवमांत, एकादशेश एकादशांत, लग्नांत किंवा पंचमांत असतां धनयोग होतो.

(३१) धनेश धनांत, पंचमेश पंचमांत, एकादशेश एकादशांत, लग्नांत किंवा नवमांत असतां धनयोग होतो.

(३२) लग्नेश लग्नांत, पंचमांत किंवा नवमांत, धनेश धनांत, एकादशेश एकादशांत, असतां धनयोग होतो.

(३३ लग्नेश पंचमांत, लग्नांत किंवा एकादशांत, धनेश धनांत, नवमेश नवमांत, असतां धनयोग होतो.

(३४) लग्नेश लग्नांत, पंचमांत किंवा एकादशांत, धनेश धनांत, पंचमेश पचमांत असतां धनयोग होतो.

(३५) धनेश धनांत, लग्नांत किंवा पंचमांत, नवमेश नवमांत, एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(३६) धनेश लग्नांत, धनांत किंवा नवमांत, पंचमेश पंचमांत, एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(३७) धनेश धनांत, लग्नांत, एकादशांत, पंचमेश पंचमांत, नवमेश नवमांत असतां धनयोग होतो.

(३८) लग्नेश लग्नांत, पंचमेश धनांत, पंचमांत किंवा नवमांत, एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(३९) लग्नेश लग्नांत, पंचमेश धनांत, पंचमांत किंवा एकादशांत नवमेश नवमांत असतां धनयोग होतो.

(४०) लग्नेश लग्नांत, धनेश धनांत, पंचमेश पंचमांत, नवमांत किंवा एकादशांत असतां धनयोग होतो.

(४१) लग्नेश लग्नीं, नवमेश धनांत, नवमांत किंवा पंचमांत, एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(४२) लग्नेश लग्नांत, पंचमेश पंचमांत, नवमेश नवमांत, धनांत किंवा एकादशांत असतां धनयोग होतो.

(४३) लग्नेश लग्नांत, धनेश धनांत, नवमेश नवमांत, पंचमांत किंवा एकादशांत असतां धनयोग होतो.

(४४) लग्नेश लग्नांत, नवमेश नवमांत, एकादशेश एकादशांत, धनांत किंवा पंचमांत असतां धनयोग होतो.

(४५) लग्नेश लग्नांत, पंचमेश पंचमांत, एकादशेश धनांत, एकादशांत किंवा नवमांत असतां धनयोग होतो.

(४६) लग्नेश लग्नीं, धनेश धनांत, एकादशेश एकादशांत, पंचमांत किंवा नवमात असतां धनयोग होतो.

(४७) एकादशेश एकादशांत, लग्नेश लग्नांत, धनांत, पंचमांत किंवा नवमांत असतां धनयोग होतो.

(४८) लग्नेश लग्नांत, धनात, पंचमांत, किंवा एकादशांत आणि नवमेश नवमांत असतां धनयोग होतो.

(४९) लग्नेश लग्नांत, धनांत, पंचमांत, नवमांत किंवा एकादशांत असतां धनयोग होतो.

(५०) धनेश धनांत, लग्नांत, नवमांत, पंचमांत आणि एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(५१) धनेश धनांत, लग्नांत, नवमांत, एकादशांत आणि पंचमेश पंचमांत असतां धनयोग होतो.

(५२) धनेश धनांत, लग्नांत, पंचमांत, नवमांत, एकादशांत असतां धनयोग होतो.

(५३) पंचमेश लग्नांत, पंचमांत, धनांत, नवमांत आणि एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(५४) पंचमेश पंचमांत, लग्नांत, धनांत, एकादशांत आणि नवमेश नवमांत असतां धनयोग होतो.

(५५) पंचमेश पंचमांत, लग्नांत, धनांत, नवमांत किंवा एकादशांत असतां धनयोग होतो.

(५६) नवमेश नवमांत, लग्नांत, धनांत किंवा पंचमांत आणि एकादशेश एकादशांत असतां धनयोग होतो.

(५७) पंचमेश पंचमांत, नवमेश नवमांत, लग्नांत, धनांत किंवा एकादशांत असतां धनयोग होतो.

(५८) नवमेश नवमांत, एकादशांत, लग्नांत, धनांत किंवा पंचमांत असतां धनयोग होतो.

(५९) नवमेश नवमांत, एकादशेश एकादशांत, लग्नांत, धनांत किंवा पंचमांत असतां धनयोग होतो.

(६०) पंचमेश पचमांत, एकादशेश एकादशांत, लग्नांत, धनांत किंवा नवमांत असतां धनयोग होतो.

(६१) लगनेश आणि धनेश, पंचमेश, नवमेश किंवा एकादशेश यांचा शुभसंबंध असेल तर धनयोग होतो.

(६२) लग्नेश, धनेश, पंचमेश, नवमेश, एकादशेश यांचा परस्परांशीं

लग्नांतून, द्वितीयांतून, पंचमांतून, नवमांतून किंवा एकादशस्थानांतून शुभयोग अगर शुभसंबंध घडत असेल तर धनयोग होतो.

(६३) लग्नीं मंगळ, मेष किंवा वृश्चिक राशीचा असून तो बुध, शुक्र, शनि यांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर मनुष्य श्रीमंत होतो.

(६४) लग्नीं बुध, मिथुन किंवा कन्या राशीचा असून शनि, शुक्र यांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर मनुष्य मोठा धनवान् होतो.

(६५) लग्नीं वृषभ किंवा तूळ राशीचा शुक्र असून शनि, बुध यांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर मनुष्य मोठा धनवान् होतो.

(६६) लग्नीं कर्क राशीचा चंद्र असून तो गुरु, मंगळ यांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर मनुष्य धनवान् होतो.

(६७) लग्नीं सिंह राशीचा रवि असून मंगळानें किंवा गुरूनें युक्त किंवा दृष्ट असल्यास मनुष्य धनवान् होतो.

(६८) लग्नीं धनु किंवा मीन राशीचा गुरु असून बुध, मंगळ यांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर मनुष्य मोठा श्रीमंत होतो.

(६९) पंचमांत स्वगृहींचा शुक्र व लाभस्थानीं शनि असतां मनुष्य धनवान् होतो.

(७०) पंचमांत स्वगृहींचा शनि व लाभांत बुध अगर मंगळ असतां धनयोग होतो.

(७१) पंचमांत स्वगृहींचा रवि व लाभस्थानीं गुरु असेल तर मनुष्य श्रीमंत होतो.

(७२) पंचमांत स्वगृहींचा गुरु असून लाभस्थानीं चंद्र, मंगळ असतील तर मनुष्य धनवान् होतो.

(७३) धनेश व लग्नेश परस्पर दृष्ट असतील अगर युत असतील तर स्वपराक्रमानें धनसंपादन होतें.

(७४) धनेश ज्या ठिकाणीं असेल त्या स्थानांत जो नातेवाईक असेल तो धन देण्यास कारणीभूत होतो.

(७५) चंद्राच्या लाभस्थानीं बुध असेल तर त्यास पावलोंपावलीं लाभ होतो.

(७६) चंद्राच्या द्वितीय स्थानांत जन्मतः शुक्र असतां तो अत्यंत धनवान् होतो.

(७७) लाभाधिपति दशमाधिपतीनें युक्त किंवा दृष्ट असल्यास देव-धेव करून धन संपादन करितो.

(७८) लाभाधिपति केंद्रांत किंवा त्रिकोणांत असल्यास धनलाभ होतो.

(७९) लाभाधिपति लाभस्थानीं पापग्रहांनीं युक्त असल्यास धन-लाभ होतो.

(८०) केंद्र त्रिकोणयोग होत असेल तर मनुष्य श्रीमंत होतो.

(८१) शुक्र जर स्वगृहींचा, उच्चीचा, उदित, मित्रक्षेत्रीं असेल तर धनप्राप्ति नेहमीं होते.

(८२) धनेश एकादशांत स्वगृहींचा, उच्चीचा अगर मित्रक्षेत्रीं असेल तर लक्ष्मीचें आगमन सतत असतें.

(८३) धनेश शनि असून तो जर लाभांत असेल तर अकस्मात् लाभ होऊन तो केव्हां नाश पावेल हें सांगवत नाहीं.

(८४) धनेश शनि असून तो जर उच्चीचा, लाभांत असेल तर धनप्राप्ति आकस्मिकरीत्या होते व ती कायम टिकते.

(८५) धनेश पंचमांत बलवान् असेल तर विद्येच्या जोरावर धनप्राप्ति होते व मिळकतींत भर पडते.

(८६) धनस्थानचा स्वामी लग्नीं व लग्नेश धनस्थानीं हा योग संपत्ति मिळण्यास उत्तम असतो.

(८७) धनस्थानीं कर्क, वृश्चिक, मीन या राशींत एकादा शुभग्रह असेल, तर जन्मणाऱ्या मनुष्याची वडिलार्जित इष्टेट चांगली असते; निदान जन्म-काळीं तरी सांपत्तिक परिस्थिति समाधानकारक असते.

(८८) अष्टमस्थानीं गुरु अगर शुक्र, स्वगृहीं अगर उच्चीचा असेल

तर आकस्मिक लाभ होईल, मृत्युपत्रद्वारां इस्टेट मिळेल, लॉटरींत पैसे मिळतील.

(८९) अष्टमस्थानचा स्वामी सप्तमस्थानीं असल्यास स्त्रीकडून द्रव्य-प्राप्ति होते.

(९०) नवमस्थानीं गुरु चंद्र असतां दिगंत कीर्ति होते. जगांतील प्रसिद्ध पुरुषांच्या कुंडलींत हा योग असतो, किंवा याच स्थानांतून गुरु-चंद्राचा नवपंचम झालेला दृष्टीला पडतो.

(९१) एकादशस्थानांत कोणताही ग्रह लाभदायक असतो.

(९२) मिथुन राशीचा राहू, पंचमस्थानीं, नवमस्थानीं व एकादश-स्थानीं वारंवार द्रव्यप्राप्ति करून देतो.

(९३) कुंडलींतील बहुतेक ग्रह उदित भागांत म्हणजे सप्तमापासून द्वादशापर्यंत असतां संपत्तीस फार चांगला योग होतो.

(९४) गुरु जर पांचव्या अगर नवव्यास्थानीं असेल तर दारिद्र्य येण्याचा कधींही संभव नसतो.

(९५) सप्तमस्थानीं वृषभ अगर तूलाराशींत शुक्रचंद्राची युति असेल तर वडिलोपार्जित इष्टेट चांगली असते.

(९६) जेव्हां चलित चंद्र ३-५-९-११ या स्थानीं जन्म चंद्राला येईल तेव्हां ते दिवस तात्पुरते तरी लाभदायक व सुखदायक असतात.

(९७) केंद्रांत मेष, कर्क, तूल व मकर या राशी असलेले लोक जगांत पुढें येतात.

(९८) केंन्द्राधिपति ५ व ९ या स्थानांच्या स्वामींशीं युक्त असल्यास तें भाग्याचें लक्षण समजावें.

(९९) द्वितीयस्थानच्या गुरूशीं रवि, चंद्र अथवा शनि जर नवपंचम योग करितील तर अशा योगावर जन्मणारा मनुष्य श्रीमत होतो.

(१००) दशमांत गुरु असणें हा उत्तम योग आहे, अशा मनुष्याला धनाच्या बाबतींत कधींच कमी पडत नाहीं.

(१०१) धनयोग पाहत असतां चतुर्थस्थान अवश्य विचारांत घ्यावयास पाहिजे.

(१०२) चतुर्थस्थानांत रवि, चंद्र, गुरु, शुक्र असल्यास जन्मणारास आयुष्याच्या उत्तरभागीं संपत्तिसुख चांगलें मिळतें; त्याठिकाणीं ग्रह स्थानबली किंवा राशीबली असावे लागतात.

(१०३) शनि अथवा गुरु हे सप्तमस्थानचे स्वामी असून ते जर परस्पर नवपंचम योग करीत असतील तर सासऱ्याकडून द्रव्य मिळतें.

(१०४) पंचमांत अथवा नवमांत असणारे ग्रह बुद्धि, विद्या, वैभव, श्रेष्ठत्व देऊन संपत्तीस चांगले असून भाग्याला पोषक असतात.

(१०५) लग्नांत जर द्वितीयेश असेल तर विनासायासानें द्रव्य मिळतें.

(१०६) द्वितीयेश ज्या भावाधिपतीबरोबर लग्नांत असेल तर तो भावाधिपति ज्या स्थानचा द्योतक असेल, त्या स्थानातील नातेवाइकाकडून द्रव्यप्राप्ति होते.

(१०७) अष्टमेश नवमांत असतां लोकांचा विश्वास फार बसतो व त्यामुळें तो विश्वस्त होतो.

(१०८) लग्नेश लग्नीं असून, तो त्रिकोणाधिपतीनें दृष्ट असेल तर उत्तम धनयोग समजावा.

(१०९) लग्नापासून अगर चंद्रापासून ३–६–१०–११ या स्थानीं सर्व शुभ ग्रह असतील तर तो उत्तम प्रकारचा धनयोग होतो.

(११०) लग्नेश धनस्थानीं, धनेश लाभस्थानीं व लग्नेश लग्नीं हा योग धनदायक या दृष्टीनें लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे.

(१११) लग्नस्वामी बलवान् असून धनस्वामी हा जायास्वामी व शुक्र यांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर अचानक धनयोग होतो.

(११२) अष्टमस्थानचा अधिपति जेथें असेल त्याच्या दुसऱ्या घरांत, धनाधिपति असेल तर अचानक धनलाभ होतो.

(११३) व्ययांतील राहूबरोबर जर धनेश, लग्नेश व पंचमेश लाभयोग करीत असतील तर अचानक धनलाभ होतो.

(११४) धनेश लग्नाधिपतीस पाहत असेल अगर दोघेही एकाच स्थानांत असतील तर तो मनुष्य स्वपराक्रमानें धन संपादन करितो.

(११५) धनाधिपति गुरूनें दृष्ट अथवा सिंहासनांशीं किंवा पारबतांशीं असेल तर त्या माणसाचे पदरीं एक हजार माणसें ठेवावयाचें सामर्थ्य असतें.

(११६) केंद्रांत मेष, कर्क, तुला, मकर राशींत बरेच ग्रह असल्यास तो मनुष्य मोठया दर्जाचा, विचारसंपन्न, अधिकारयुक्त, उच्च व गौरवयुक्त असा असतो.

(११७) केंद्रांत मिथुन, कन्या, धनु, मीन राशींत बरेच ग्रह असल्यास मनुष्य फार हुषार, बुद्धिमान्, कर्तृत्ववान्, चलाख, उदार, बहुश्रुत व अनेकांना प्रिय असतो.

(११८) कोणताही ग्रह शुभस्थानीं, शुभराशींत, शुभसंबोधित, शुभग्रहांनीं दृष्ट, स्थानबली असल्यास धनयोगाला पोषक असतो; व त्या माणसाला द्रव्याच्या बाबतींत अडचण पडत नाहीं.

(११९) धनस्थानीं शुभग्रह असतां व ते नीच किंवा अस्तंगत नसतील तर सांपत्तिक स्थिति भरभराटीची असते.

(१२०) अष्टमेश धनांत असेल आणि तो जरी पापग्रहांनीं दृष्ट असला तरी कुटुंबांतील मृत माणसाची इष्टेट मिळण्याचा संभव असतो.

(१२१) धनस्थानीं पापग्रह असतील आणि बाराव्या घराचा मालक धनस्थानीं असेल तर खर्चांची तारांबळ उडते, खर्च भागवतां भागवतां नाकीं नऊ येतात.

(१२२) धनेश चतुर्थांत असेल व तो बलवान् असेल तर आयुष्याचे उत्तरभागीं धनसंग्रह होऊं शकतो.

(१२३) लग्नेश लग्नांत असून त्रिकोणाधिपतीनें दृष्ट असेल तर तो उत्तम धनयोग समजावा.

(१२४) धनाधिपति ज्या राशींत असेल त्याच ठिकाणीं लग्नेश व बुध असेल, व त्या भावाचा स्वामी लग्नांत बलवान् असेल, तर मनुष्य उत्तरार्धांत धन संपादन करितो.

(१२५) लाभेश ज्या राशीस असेल त्या राशीचा स्वामी, शुभग्रहानें दृष्ट व शुभग्रहाचे मध्यें असल्यास द्रव्यप्राप्ति चांगली असते.

(१२६) चंद्राच्या द्वितीय स्थानांत जन्मतः शुक्र असतां तो मनुष्य अत्यंत धनवान् होतो.

(१२७) लाभाधिपति दशमाधिपतीनें युक्त किंवा दृष्ट असल्यास देवघेव करून धन संपादन होतें.

(१२८) लाभाधिपति केंद्रांत अगर त्रिकोणांत असल्यास अगर लाभस्थानींच पापग्रहानें युक्त असल्यास धनलाभ होतो.

(१२९) लग्नेश धनस्थानीं, शुभसंबोधित असतां द्रव्यसंग्रह चांगला होतो.

(१३०) लग्नेश शुक्र चतुर्थांत असतां जमिनदार होऊन इमारती बांधतो व धनलाभ चांगला होतो.

(१३१) अष्टमस्थानीं शुक्र असलेला मनुष्य लाचलुचपतीनें द्रव्य मिळवितो.

(१३२) लग्नेश धनस्थानीं असतां मनुष्य धनसंचय करितो व देवघेवीमध्यें कुशल असतो.

(१३३) लग्नेश पंचमस्थानांत असतां धनप्राप्ति होते.

(१३४) लग्नेश एकादशस्थानीं असतां निरनिराळ्या प्रकारें द्रव्यलाभ होतो.

(१३५) धनेश धनस्थानीं असतां वडलोपार्जित धन मिळतें. सावकारी करतो.

(१३६) धनेश पंचमांत असतां मनुष्य गर्भश्रीमंत असतो.

(१३७) धनेश अष्टमांत असतां हुंडा, सट्टा, रेस, लॉटरी यानें द्रव्य मिळतें.

(१३८) धनेश लाभांत असतां पुष्कळ संपत्ति मिळते, मौल्यवान् वस्तूंची प्राप्ति होते.

(१३९) तृतीयेश चतुर्थस्थानीं असतां मनुष्य स्वतः धन मिळवितो. शेती व बागा खरेदी करितो.

(१४०) तृतीयेश लाभांत असतां मनुष्य व्यापारांत पुष्कळ पैसा मिळवितो.

(१४१) चतुर्थेश पंचमांत असतां मनुष्य श्रीमंत असतो.

(१४२) चतुर्थेश सप्तमांत असतां व्यापारांत धन मिळतें.

(१४३) चतुर्थेश अष्टमांत असतां भूमिगत द्रव्य मिळतें.

(१४४) पंचमेश चतुर्थांत असतां श्रीमंती प्राप्त होते.

(१४५) पंचमेश एकादशस्थानीं असतां मनुष्य धनाढ्य होतो.

(१४६) सप्तमेश धनस्थानीं असतां व्यापारांत द्रव्य मिळतें, स्त्री-कडून द्रव्य मिळतें.

(१४७) सप्तमेश लाभांत असतां व्यापारांत द्रव्य फार मिळतें.

(१४८) अष्टमेश द्वितीयांत असतां गुप्तधन मिळतें.

(१४९) अष्टमेश चतुर्थांत असतां वेवारशी धन मिळतें. विना-सायासानें द्रव्यप्राप्ति होते.

(१५०) अष्टमेश अष्टमांत असतां आयतें भूमिगत द्रव्य मिळतें.

(१५१) अष्टमेश एकादशस्थानीं असतां द्रव्यप्राप्ति फार चांगली होते. वक्षिसें मिळतात, मित्र द्रव्याची मदत करितात.

(१५२) नवमेश प्रथमस्थानीं असतां मनुष्य जरी गरीब असला तरी श्रीमंत होईल. द्रव्य चांगलें मिळतें.

(१५३) नवमेश धनस्थानीं असतां त्या माणसाला द्रव्याची टंचाई कधींच पडत नाहीं.

(१५४) नवमेश पंचमस्थानीं असतां द्रव्याचे बाबतींत चिंता करावी लागत नाहीं.

(१५५) नवमेश सप्तमस्थानीं असतां व्यापारांत द्रव्य चांगलें मिळतें.

(१५६) नवमेश एकादशस्थानीं असतां लक्ष्मीची कृपा निरंतर राहते. संपत्ति कधींही हटत नाहीं.

(१५७) दशमेश धनस्थानीं असतां राजाकडून द्रव्य मिळतें.

(१५८) लाभेश लाभांत असतां वरचेवर विशेष प्रकारचे लाभ होतात.

(१५९) लाभेश नवमांत असतां मनुष्य दरिद्री नसतो.

(१६०) लाभेश अष्टमांत असतां वेवारशी द्रव्य मिळतें.

(१६१) लाभेश सप्तमांत असतां स्त्री द्रव्य मिळवून देण्याचे कामीं कारणीभूत होते.

(१६२) लाभेश पंचमांत असला तर हरतऱ्हेची द्रव्यप्राप्ति होते.

(१६३) लाभेश चतुर्थांत असतां स्थावर इस्टेट चांगली असते.

(१६४) लाभेश तृतीयांत असतां मनुष्य स्वपराक्रमानें द्रव्य संपादन करितो.

(१६५) लाभेश द्वितीयस्थानीं असतां मनुष्य सावकारी, व्याज-बट्ट्याचा धंदा करितो.

---

४. सांपत्तिक लाभ.

मनुष्याला वास्तविक आद्यापेक्षां अधिक आदा ज्या काळीं होतो, तोच संपत्तीचा लाभकाल होय.

लाभकालांत आपल्या नित्याच्या व्यवहारापेक्षां जितका नफा व्हावयाचा, त्यापेक्षां कल्पनाबाह्य संपत्ति कोठून तरी प्राप्त होते.

लाभकाळाचें महत्त्व नौकरीपेक्षां स्वतंत्र धंद्यांत अधिक असतें. कारण नौकरदारांची प्राप्ति ठरलेली असते. त्यांच्या बढतीचे खात्यानिहाय विशेष प्रकारचे नियम असतात; त्यामुळें त्यांना लाभकाळींसुद्धां विशेष संपत्ति-लाभ होत नाहीं.

शाळाखात्यांत नौकरी करणाऱ्या मास्तराला लाभकाळ कसला ? विशेष लाभ झाला तर तो शिकवणीचा; नाहींपेक्षां पगाराबाहेर प्राप्ति व्हायची आशाच नाहीं. असल्या दुर्दैवी माणसास लाभकाळ काय करणार ?

त्याच्या उलट स्वतंत्र धंदा करणाऱ्या माणसाची स्थिति असते. असा मनुष्य लाभकाळीं रंकाचा राव बनतो. तेव्हां सांपत्तिक लाभ मनुष्यास केव्हां होतात तें पाहूं.

जन्म कुंडलींत ९ वें स्थान, ११ वें स्थान, २ रें स्थान व ५ वें स्थान हीं चार सांपत्तिक लाभदायक स्थानें आहेत.

त्याच्या खालोखाल १० वें स्थान, १ लें स्थान, ४ थें स्थान व ७ वें स्थान, हीं मध्यम सांपत्तिक लाभ देणारीं स्थानें आहेत.

ज्या स्थानांत जो आंकडा असतो तो राशीचा दर्शक असतो.

एकाद्या स्थानांत ९ हा आंकडा असेल तर ९ वी रास धन व धन-राशीचा मालक गुरु आहे व गुरु हाच त्या स्थानचा मालक असतो.

कोणत्याही ग्रहांचे स्वगृह, उच्चक्षेत्र, मूलत्रिकोण, मित्रक्षेत्र, नीचक्षेत्र शत्रुक्षेत्र व स्थानमहात्म्य या सर्व गोष्टी विचारांत घेऊन लाभकाळाचे नियम ठरवावयाचे असतात.

ज्योतिषशास्त्रांतील कोणतीही वरी अगर वाईट गोष्ट पाहतांना फल-ज्योतिषाची भाषा पूर्णपणें माहीत असावयास पाहिजे.

खालील गोष्टींवरून प्रत्येकानें आपला लाभकाळ ठरवावा.

(१) संपत्तिदायक स्थानाचे अधिपति स्वगृहीं, उच्चक्षेत्रीं, मूल-त्रिकोणीं आले असतां संपत्तिलाभ होतो.

(२) संपत्तिदायक स्थानाचे स्वामी कोणत्याही संपत्तिदायक स्थानीं आले असतां सांपत्तिक फायदा होतो.

(३) संपत्तिदायक स्थानचे स्वामी एकमेकांच्या घरीं कोणत्याही संपत्तिदायक स्थानीं आले असतां सांपत्तिक दृष्ट्या काळ भरभराटीचा जातो.

(४) संपत्तिदायक स्थानच्या अधिपतीची कोणत्याही संपत्तिदायक स्थानीं युति झाली कीं सांपत्तिक लाभकाळ आहे असें समजावें.

(५) संपत्तिदायक स्थानांत गुरु आला असतां संपत्तिलाभ होतो.

वरील ५ नियम जन्मकुंडली व राशीकुंडली यांच्या अनुरोधानें ठरवावे. दोन्ही कुंडल्या जर सांपत्तिक लाभकाळ दर्शवीत असतील तर सांपत्तिक भरभराट निश्चित् चांगली होईल हें जाणावें. दोहोंपैकीं एकींत होत असेल तर तो काळ मध्यम, दुय्यम प्रतीचा आहे असें समजावें. संपत्ति देणारी ग्रह पारीस्थिति सांपत्तिक हानि करणाऱ्या ग्रह परिस्थितीपेक्षां बलवत्तर असावी.

---

५. द्वादश लग्नांला धन देणारे ग्रह.

लग्नमेषः—मेष ही राशी-चक्रांतील पहिली रास असून, पहिल्या ३० अंशाच्या विभागाला मेष हें नांव आहे. यांत अश्विनी, भरणी व कृत्तिका नक्षत्राचा $\frac{1}{4}$ विभाग येत असून या राशीचा मालक, स्वामी, अधिपति, मंगळ आहे.

ज्यांचें मेष लग्न असेल त्यांना रवि, मंगळ, चंद्र, शुक्र फल उत्पन्न करितात; गुरु, शनि मध्यम, व शुक्र, बुध अशुभ फल उत्पन्न करितात.

मेष लग्नाला धन देणारे ग्रह शुक्र, रवि, शनि आणि चंद्र हे होत. विशेषतः रवि, चंद्र मुख्य समजावे. ज्यावेळीं धन देणारे ग्रह धन देणाऱ्या स्थानांतून भ्रमण करितात किंवा आपल्या उच्च गृहीं, स्वक्षेत्रीं येतात

अगर धन देणाऱ्या ग्रहांचा परस्परांशीं शुभयोग घडतो, तो काळ मानवी जीवनांत संपत्तिदायक जातो.

लग्नवृषभः— वृषभ ही राशी-चक्रांतील दुसरी रास होय. राशीचक्राच्या दुसऱ्या ३० अंशाच्या विभागाला वृषभ हें नांव आहे. यांत कृत्तिका-नक्षत्राचा $\frac{3}{4}$ विभाग, रोहिणी व मृगनक्षत्राचा $\frac{1}{2}$ विभाग येत असून या राशीचा मालक, स्वामी, अधिपति शुक्र आहे.

ज्यांचें वृषभ लग्न असेल, त्यांना शुक्र, बुध, शनि, रवि, शुभ फल उत्पन्न करितात. गुरु मध्यम व मंगळ अनिष्ट फल उत्पन्न करितो.

वृषभ लग्नाला धन देणारे ग्रह बुध, गुरु आहेत. विशेषतः बुध मुख्य समजावा. शनि हा ग्रह या लग्नाला राजयोगकारक आहे.

ज्यावेळीं धन देणारे ग्रह धन देणाऱ्या स्थानांतून भ्रमण करितात किंवा आपल्या उच्चगृहीं स्वक्षेत्रीं येतात अगर धन देणाऱ्या ग्रहांचा परस्परांशीं शुभयोग घडतो, तो काळ मानवी जीवनांत संपत्तिदायक जातो.

लग्नमिथुनः— मिथुन ही राशी चक्रांतील तिसरी रास होय. राशी-चक्राच्या तिसऱ्या ३० अंशाच्या विभागाला मिथुन हें नांव आहे. यांत मृगनक्षत्राचा शेवटचा $\frac{1}{2}$ विभाग, आर्द्रा, व पुनर्वसु नक्षत्राचा $\frac{3}{4}$ विभाग येत असून या राशीचा मालक, स्वामी, अधिपति बुध आहे.

ज्यांचें मिथुन लग्न असेल त्यांना बुध, शुक्र, गुरु शुभफल उत्पन्न करितात; शनि मध्यम; मंगळ, रवि अशुभ फल उत्पन्न करितात.

मिथुन लग्नाला धन देणारे ग्रह मंगळ , चंद्र, शुक्र हे होत. विशेषतः शनि मुख्य समजावा. या लग्नाला राजयोगकारक ग्रह गुरु आहे.

ज्यावेळीं धन देणारे ग्रह धन देणाऱ्या स्थानांतून भ्रमण करितात किंवा आपल्या उच्चगृहीं, स्वक्षेत्रीं, येतात अगर धन देणाऱ्या ग्रहांचा परस्परांशीं शुभसंबंध घडतो तो काळ मानवी जीवनांत संपत्तिवर्धक जातो.

लग्नकर्कः— कर्क ही राशी-चक्रांतील चवथी रास होय. राशी चक्रांतील चवथ्या ३० अंशाच्या विभागाला कर्क हें नांव आहे. यांत पुनर्वसु

नक्षत्राचा शेवटचा $\frac{१}{४}$ विभाग, पुष्य आणि आश्लेषा हीं नक्षत्रें येत असून या राशीचा स्वामी, मालक, अधिपति चंद्र आहे.

ज्यांचें कर्क लग्न असेल त्यांना, चंद्र, मंगळ, गुरु शुभ फल उत्पन्न करितात; बुध मध्यम व रवि, शनि अनिष्ट फल उत्पन्न करितात.

कर्क लग्नाला धन देणारे ग्रह रवि, मगळ, शुक्र समजावे. विशेषतः मंगळ मुख्य समजावा.

ज्यावेळीं धन देणारे ग्रह धन देणाऱ्या स्थानांतून भ्रमण करितील किंवा आपल्या उच्चगृहीं, स्वक्षेत्रीं येतील अगर धन देणाऱ्या ग्रहांचा परस्परांशीं शुभयोग घडतो, त्यावेळीं मनुष्याच्या आयुष्यांत सुखदायक व संपत्तिदायक काळ जातो.

लग्नसिंह:— सिंह ही राशीचक्रांतील पांचवी रास आहे. राशीचक्रांतील पांचव्या ३० अंशांच्या विभागाला सिंह हें नांव आहे. यांत मघा, पूर्वा, व उत्तरा नक्षत्राचा पहिला $\frac{१}{४}$ विभाग येत असून या राशीचा मालक, स्वामी, अधिपति रवि आहे.

ज्यांचें सिंह लग्न असेल त्यांना रवि, गुरु, मंगळ शुभ फल उत्पन्न करितात. शुक्र मध्यम व शनि, चंद्र अशुभ फल उत्पन्न करितात.

सिंह लग्नाला धन देणारे ग्रह बुध, गुरु होत. विशेषतः बुध मुख्य समजावा.

ज्या वेळीं धन देणारे ग्रह धन देणाऱ्या स्थानांतून भ्रमण करितील अगर आपल्या उच्चगृहीं, स्वक्षेत्रीं येतील किंवा धन देणाऱ्या ग्रहांचा परस्परांशीं शुभयोग घडेल तो काळ मानवी जीवनांत संपत्तिदायक जातो.

लग्नकन्या:—कन्या ही राशी—चक्रांतील सहावी रास होय. राशीचक्रांतील सहाव्या ३० अंशांच्या विभागाला कन्या हें नांव आहे. यांत उत्तरा नक्षत्राचा शेवटचा $\frac{३}{४}$ विभाग, हस्त, व चित्राचा पहिला $\frac{१}{२}$ विभाग येत असून या राशीचा मालक, स्वामी, अधिपति बुध आहे.

ज्यांचें कन्या लग्न असेल, त्यांना बुध, शनि, शुभ फल उत्पन्न करितात. गुरु, शुक्र, मध्यम व रवि, मंगळ अनिष्ट फल उत्पन्न करितात.

कन्या लग्नाला धन देणारे ग्रह चंद्र, शुक्र, शनि. विशेषतः शुक्र मुख्य समजावा.

ज्यावेळीं धन देणारे ग्रह धन देणाऱ्या स्थानीं येतील किंवा आपल्या उच्चगृहीं, स्वक्षेत्रीं येतील अगर धन देणाऱ्या ग्रहांचा परस्पर शुभयोग घडेल, त्यावेळीं तो काळ मानवी जीवनांत संपत्तिदायक जातो.

लग्नतूळः— तूळा ही राशी-चक्रांतील सातवी रास होय. राशीचक्रांतील सातव्या ३० अंशांच्या विभागाला तूळ हें नांव आहे. यांत चित्रा नक्षत्राचा शेवटचा विभाग, स्वाती, विशाखा नक्षत्राचा $\frac{3}{4}$ विभाग येत असून या राशीचा स्वामी, मालक, अधिपति शुक्र आहे.

ज्यांचें तूळ लग्न असेल त्यांना शुक्र, शनि, बुध शुभ फल उत्पन्न करितात. चंद्र मध्यम व मंगळ, गुरु अनिष्ट फलें उत्पन्न करितात.

तूळ लग्नाला धन देणारे ग्रह मंगळ, शनि, रवि हे होत. विशेषतः शनि मुख्य समजावा.

ज्या वेळीं धन देणारे ग्रह धन देणाऱ्या स्थानांतून भ्रमण करतील किंवा आपल्या उच्चक्षेत्रीं, स्वक्षेत्रीं येतील, अगर धन देणाऱ्या ग्रहांचा परस्परांशीं शुभयोग घडेल तो काळ मानवी आयुष्यांत संपत्तिदायक आहे असें समजावें.

लग्नवृश्चिकः— वृश्चिक ही राशी—चक्रांतील आठवी रास होय. राशीचक्रांतील आठव्या ३० अंशांच्या विभागाला वृश्चिक हें नांव आहे. यांत विशाखा नक्षत्राचा शेवटचा $\frac{1}{4}$ विभाग, अनुराधा व ज्येष्ठा हीं नक्षत्रें येत असून या राशीचा स्वामी, मालक व अधिपति मंगळ आहे.

ज्यांचें वृश्चिक लग्न असेल, त्यांना मंगळ, रवि, चंद्र शुभफल उत्पन्न करितात; गुरु मध्यम व शुक्र, शनि, बुध अशुभ फल उत्पन्न करितात.

वृश्चिक लग्नाला धन देणारे ग्रह: गुरु, बुध होत. विशेषतः गुरु मुख्य समजावा.

ज्यावेळीं धन देणारे ग्रह धन देणाऱ्या स्थानांतून भ्रमण करितील अगर आपल्या उच्चक्षेत्रीं, स्वक्षेत्रीं येतील, किंवा धन देणाऱ्या ग्रहांचा परस्परांशीं शुभसंबंध घडेल त्यावेळीं मानवी जीवनांत तो काळ संपत्तिदायक समजावा.

लग्नधनुः— धनु ही राशी–चक्रांतील नववी रास आहे. राशीचक्रांतील नवव्या ३० अंशांच्या विभागाला धनु हें नांव आहे. यांत मूळ, पूर्वाषाढा व उत्तराषाढा नक्षत्राचा पहिला $\frac{1}{4}$ विभाग येत असून या राशीचा स्वामी, मालक व अधिपति गुरु आहे.

ज्यांचें धनु लग्न असेल त्यांना गुरु, रवि शुभफल उत्पन्न करितात. बुध, मंगळ मध्यम व शनि, शुक्र, चंद्र अनिष्टफल उत्पन्न करितात.

धनुलग्नाला धन देणारे ग्रह शनि, शुक्र, मंगळ होत. विशेषतः शनि मुख्य समजावा.

ज्यावेळीं धन देणारे ग्रह धन देणाऱ्या स्थानांतून भ्रमण करितील, किंवा आपल्या उच्चक्षेत्रीं, स्वक्षेत्रीं येतील अगर धन देणाऱ्या ग्रहांचा परस्परांशीं शुभयोग घडेल तो काळ मानवी जीवनांत संपत्तिदायक आहे असें समजावें.

लग्नमकर :—मकर ही राशीचक्रांतील दहावी रास होय. राशीचक्रांतील दहाव्या ३० अंशांच्या विभागाला मकर हें नांव आहे. यांत उत्तराषाढा नक्षत्राचा शेवटचा $\frac{3}{4}$ विभाग, श्रवण व धनिष्ठा नक्षत्राचा पहिला $\frac{1}{2}$ विभाग येत असून या राशीचा स्वामी, मालक, अधिपति शनि आहे. ज्यांचें मकर लग्न असेल, त्यांना शनि, शुक्र, बुध शुभफल उत्पन्न करितात.

मकर लग्नाला धन देणारे ग्रह मंगळ, शनि, शुक्र हे होत. विशेषतः शुक्र मुख्य समजावा.

ज्या वेळीं धन देणारे ग्रह धन देणाऱ्या स्थानांतून भ्रमण करतील अगर आपल्या उच्चक्षेत्रीं, स्वक्षेत्रीं येतील किंवा धन देणाऱ्या ग्रहांचा परस्परांशीं शुभयोग घडेल तो काळ मानवी जीवनांत संपत्तिवर्धक जातो.

लग्नकुंभ :—कुंभ ही राशीचक्रांतील अकरावी रास होय. राशीचक्रांतील अकराव्या ३० अंशांच्या विभागाला कुंभ हें नांव आहे. यांत धनिष्ठा नक्षत्राचा शेवटचा $\frac{1}{2}$ विभाग शततारका व पूर्वाभाद्रपदा नक्षत्राचा पहिला $\frac{3}{4}$ विभाग येत असून या राशीचा स्वामी, मालक, अधिपति शनि आहे.

ज्यांचें कुंभ लग्न असेल त्यांना शनि, बुध, शुक्र शुभफल उत्पन्न करितात. मंगळ मध्यम व चंद्र, रवि, गुरु अशुभ फल उत्पन्न करितात.

कुंभ लग्नाला धन देणारे ग्रह गुरु, बुध होत. विशेषतः मुख्य ग्रह गुरु समजावा.

ज्यावेळीं धन देणारे ग्रह धन देण्याऱ्या स्थानांतून भ्रमण करितात अगर आपल्या उच्चक्षेत्रीं, स्वक्षेत्रीं येतात किंवा धन देणाऱ्या ग्रहांचा परस्परांशीं शुभयोग घडतो तो काळ मानवी जीवनांत संपत्तिदायक जातो असें समजावें.

लग्नमीन :—मीन ही राशी-चक्रांतील बारावी रास आहे. अर्थात् शेवटची व राशीचक्राच्या बाराव्या शेवटच्या ३० अंशांच्या विभागाला मीन हें नांव आहे. यात पूर्वाभाद्रपदा नक्षत्राचा शेवटचा $\frac{1}{4}$ विभाग, उत्तराभाद्रपदा व रेवती हीं नक्षत्रें येत असून या राशीचा स्वामी, मालक, अधिपति गुरु आहे.

ज्यांचें मीन लग्न असेल त्यांना गुरु, चंद्र, मंगळ शुभफलें उत्पन्न करितात. बुध मध्यम व शनि, रवि, शुक्र अशुभ फल उत्पन्न करितात.

मीन लग्नाला धन देणारे ग्रह मंगळ, चंद्र, शनि समजावेत. विशेषतः चंद्र मुख्य समजावा.

ज्यावेळीं धन देणाऱ्या ग्रहांचें धन देणाऱ्या स्थानांतून भ्रमण चालूं असतें अगर धन देणारे ग्रह आपल्या उच्चक्षेत्रीं, स्वक्षेत्रीं येतात, किंवा

धन देणाऱ्या ग्रहांचा परस्परांशीं शुभयोग घडतो तो काळ मानवी जीवनांत संपत्तीची भरभराट दर्शविणारा आहे असें समजावें.

---

६ कोणत्या स्थानीं काय पहावें ?

प्रथमस्थानः—स्वतःचें शरीर, शारीरिक सुखदुःखें, शरिराची ठेवण, रंग, रूप, उंची, स्थैर्य, स्वतंत्रता, चिंतानाश, मनःप्रवृत्ति, महत्त्वाकांक्षेस यश, शरिराला अपघात, स्वभाव, आवडीनिवडी, आईचा बाप, बापाची आई, भागीदार व शत्रु यांच्या बायका, मित्रांचें बंधु, नौकर, शत्रु व मातुल यांचे मृत्यु, मुलांचे लांबचे प्रवास, मुलांचा लौकिक व भाग्योदय, भावंडांचे मित्र, भावडांची आर्थिक परिस्थिति व लाभ, आजे सासू, भावंडांचे मनाचा कल, ज्ञान, प्रवृत्ति, आयुष्य, जातिवर्ण, भाग्योदय, साहस, तीळ व मश कोठें आहेत, आचरण, देहसुख, वडिलार्जित स्थावर, चुलत्याची सांपत्तिक परिस्थिति, बायकोच्या भावाचीं मुलें, बायकोचीं व्यसनें, यांचा अम्मल डोक्यावर असतो. चुलत्याची वाणी.

द्वितीयस्थान :—सांपत्तिक स्थितीचें अनुमान, द्रव्यसंग्रह होईल कीं नाहीं, दारिद्र्य, कर्ज देण्याघेण्यांत नफा-नुकसान, वक्तृत्व, लेखनपटुत्व, वाणी, खाद्यपदार्थ, कुटुंबांतील मंडळींकडून सुखदुःख, विद्येंत वक्षिसें दातृत्व, उदारपणा, बायकोचा मृत्यु, बायकांच्या कुंडलींत नवऱ्याचा मृत्यु, विधुरावस्था, सौभाग्ययोग, भागीदार व शत्रु यांचा मृत्यु. पूर्वार्जित धन, गोधन, मृत्युदायक प्रसंग, भाऊबंदकीचें वैर, पित्याची विद्या, डावा डोळा, सुवर्णरत्नादिकांची प्राप्ति, द्रव्यसंग्रही किंवा खर्चिक, वाणींतील दोष, तोतरेपणा वगैरे, आवाज, मुलांच्या सासवा (विद्दीणी), संस्कार, शेअर्स गहाणखतें, स्थावरगहाण, उन्नति किंवा अवनति, लोकांकडे येणें असलेली रक्कम, ऐहिक सुख, यांचा अम्मल मान व गळा यावर असतो.

तृतीयस्थान :—भावंडें व त्यांचेपासून सुखदुःख, पराक्रम किंवा कर्तबगारी, धाडस, कलह, लहान लहान प्रवास, हस्ताक्षर, कानासंबंधी रोग, शेजारीपाजारी व त्यांचेपासून सुखदुःख, मुलांचे मित्र व त्यांचे लाभ, बापाचे आजार, मित्रांचीं मुलें, आप्तस्वकीय यांचें सौख्य, धर्ममार्ग, बापाचे शत्रु, बापाशर गंडांतरें, उपजीवन, धर्ममार्ग, उपदेश, चाकरांचें सौख्य, हस्तकौशल्य, इतर बंधुवर्ग, पत्रव्यवहार, उद्योग, महत्त्वाकांक्षा, स्नेही व मैत्रीचे योग, बातम्या, धर्मपंथ, स्वप्न, देवळें, कारकून, दूत, खोटे कागदपत्राचा आरोप, यांचा अम्मल हात, बाहू, खांदे यांवर असतो.

चतुर्थस्थान :—आई, घर, शेती, बागाईत, बंगले, आप्त, वाहनें, छातीचे विकार, बायकांच्या कुंडलींत पतीचा धंदा, गृहसौख्य, गाडी-घोड्याचें सुख, पशूंचें सुख, वाहनसौख्य, प्रथम भावंडाची सांपत्तिक स्थिति, मित्रसुख, आयुष्यांतील अखेरचे दिवस, गुप्तधन, क्रयविक्रय, शय्या, भांडार, क्षुधा, बोध, बायकोचा बाप (सासरा), खरा जिवाला जीव देणारा मित्र, कीर्ति, अधिकार, मोठेपणा, समाजांत मानमान्यता, महत्त्वाचीं कार्यें, मृत मनुष्याची माल मिळकत, मुलांचे गुप्त शत्रु, मित्रांचे शत्रु व नौकर, यांचा अम्मल छाती व पोट यांवर असतो.

पंचमस्थान :—संतति व गर्भ, प्रथम संततीचें सर्व वर्णन, बुद्धियोग, उपासना, मंत्रविद्या, सट्टे, जुगार, लॉटरी, बायकोच्या मैत्रिणी, बायकोच्या कुंडलींत पतीचे मित्र व लाभ, बापाचा मृत्यु, मित्राची बायको, जादूटोणा, आईची वाणी, अकस्मात् लाभ, राज्यभ्रंश, वैचित्र्य, उदरस्थ विकार, चैनबाजी, कोणत्याही तऱ्हेचीं सुखदुःखें, ग्रंथकर्तृत्व, विद्याप्राप्ति, शास्त्र-ज्ञान, मुलें अगर मुलांची संख्या, मुलांपासून सुखदुःख, भावना, प्रेमसंबंध, धैर्य, प्रयत्न, आप्तभेट, आईची संपत्ति, सट्टयांत, शर्यतींत, व्यापारांत येणारें यशापयश, संगीतशास्त्र, वाद्यविद्या, यांचा अम्मल हृदय व पाठ यावर असतो.

षष्ठस्थान :—आजार, नौकर, चाकर, मामा, मावशी, चुलत्या, शत्रु, अपयश, हानी, सावत्र आई, अपघात, चिंता, व्रण, गुह्यरोग, क्रौर्य, पितृधन, पशुचौर्य, मुलांची वाणी, शंका, संशयवृत्ति, सेवावृत्ति, पाळीव जनावरें, मातुलवर्ग, रोगराई, दातृत्व, उलाढाल, लोकविरोध, ताबेदारी, औदार्य किंवा क्षुद्रबुद्धि, प्रथम मुलाची सांपत्तिक स्थिति, खंडकरी, शेतकरी, बायकोचे गुप्त शत्रु, बायकोच्या कुंडलींतील नवऱ्याचे गुप्तशत्रु, भावाकडून सुख यांचा अम्मल कोठा व आंतडीं यांवर असतो, दुसऱ्या भावंडाची सांपत्तिक स्थिति.

सप्तमस्थान :—विवाह, स्त्री व स्त्रीसुख, भागीदार, युद्ध, भांडण, कोर्टातील खटले, मध्यम प्रवास किंवा स्थानांतर, बदली, लघ्वीचा विकार, जारकर्म, भावांचीं मुलें, मुलांचे पराक्रम, विवाहसौख्य, स्पर्धा करणारे लोक, व्यापार, हरवलेलें धन, कामशक्ति, भोग, नाभीप्रदेश, आगमन, शेतकी, हस्तव्यवसाय, कलाकौशल्य. स्वतःचा अधःपात, स्वतःचीं व्यसनें, दिवाणी दावे, पातीचा व्यापार, नातेवाईकाखेरीज इतर लोकांशीं होणारा व्यवहार, महायात्रादि योग, व्यापार, उघड उघड स्पर्धा करणारा वर्ग, झोंप, युद्ध, प्रीति, उघड शत्रु, न्यायदरबारांत चालणारे खटले, आईची आई (आजी), बापाचा बाप (आजा), चोऱ्या, स्थलांतरें, बापाचे ग्रह, बंधूंचीं मुलें, मुलांचें लहान लहान प्रवास, कुटुंबांतील मंडळींचे आजार याचा अम्मल कमरेवर असतो.

अष्टमस्थान :—आयुष्य, हुंडा, ठेवी, अचानक द्रव्यप्राप्ति, मृत्युपत्रद्वारां मिळणारें धन, मित्रांचा धंदा, मुख्य विरोध, भुयारें, गुप्तरोग, बेवारशी धन, मृत्यु, मृत्यूची कारणें, बंधूंचे आजार, मित्रांचा धंदा, शून्यभूमि, पूर्वजांचें धन, भूमिगत द्रव्य, कर्ज देण्याघेण्याचे व्यवहार, दारिद्र्य, औदार्य, संकटें, नौकरींत लांचलुचपतीनें फायदा, मनोव्यथा, अपमृत्यु, आत्महत्यादिक अनिष्ट मरण, ज्वरादिरोगोद्भव, बायकोची वाणी, मुलांचे सासरे, होणारें कर्ज, मृत्यूच्या वेळची स्थिति, सासरच्या माणसांची

स्थिति, राजकीय सकटें, बेअब्रू, फौजदाऱ्या, परस्त्रीसंबंध, भागीदार व उघड शत्रु यांची सांपत्तिक स्थिति, पहिल्या भावंडाचा आजार, तिसऱ्या भावंडाची सांपत्तिक स्थिति, विवाहामुळें प्राप्त होणारें धन, दुसऱ्या मुलाची सांपत्तिक स्थिति, मुलांचें सुख यांचा अम्मल गुप्तइंद्रियावर असतो.

नवमस्थान :—धर्मक्रिया, साक्षात्कार, लोकशिक्षण, कीर्ति, यश, भाग्य, भजनपूजन, सत्संग, दीक्षा, देशांतर, फार लांबचे प्रवास, जल-प्रवास, परराष्ट्रांत जाण्याचा योग, परोपकार, महायात्रा, भावांच्या बायका, बहिणींचे नवरे, बायकोचे भाऊ, मुलांच्या विद्या, मुलांचीं मुलें, मित्रांचा लाभ, पत्नीचें हस्तकौशल्य, तपश्चर्या, क्षमा, लौकिक, साधुपुरुषांचीं व पुण्यक्षेत्रांचीं दर्शनें, तत्त्वज्ञान, बुद्धिमत्ता, ग्रंथप्रकाशन, भक्तिमार्ग, उत्कर्ष, समाजकार्य, राष्ट्रकार्य, सार्वजनिक कामगिरी, लोकप्रीति, कोणत्याही संस्थेचा अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सेक्रेटरी, परकीय देश, धर्मोपदेशक, गुरु, दानधर्म, विमे, ईश्वरोपासना, यांचा अम्मल मांड्या व मांड्यांच्या पश्चिम-भाग यांवर असतो.

दशमस्थान :—उद्योगधंदा, मानसन्मान, हुद्दा, राजकीय व्यवहार, यज्ञयागादि क्रिया, बाप, भावंडांचे मृत्यु, मुलांचे आजार, अधिकार, कीर्ति, आपल्या हातून घडणारीं वरीं-वाईट कृत्यें, पितृभक्ति, भोक्तृत्व, जलाशय, स्थावर मिळकत, धंद्याकरितां करावे लागणारे प्रवास, वैभव, मित्रसुख, नौकरी, व्यापार, राजाश्रय, राजापासून विशेष अधिकार, पदव्या, बायकोची आई (सासू), पितृसुख, सत्ता, यश, जबाबदारीचीं स्वतंत्र अगर सार्वजनिक संस्थेचीं कार्यें, चोरानें लांबवलेला माल, न्यायाधीश, मुलांचे आजार, वैवाहिक सुख, मामाचीं व मावशीचीं मुलें, समाजांत श्रेष्ठपणा, घराचे बाहेर पडल्यानंतर बाहेर ज्या ज्या गोष्टींशीं संबंध येईल त्या त्या गोष्टी, कीर्तिकारक अगर अपकीर्तिकारक गोष्टी, याचा अम्मल गुडघे व मांड्यावर असतो.

एकादशस्थान :—लाभ, सुना, जांवई, मित्र, द्रव्यप्राप्ति, मौल्यवान् वस्तूंची प्राप्ति, हत्ती, घोडे, पालख्या यांचें वैभव, पितृधन, जंगम माल, संसार सुख, आशेची फलद्रूपता, आपल्या शत्रूंचे शत्रु, आईचा मृत्यु, भावांचे भाग्योदय, त्यांचे लांबचे प्रवास, वायकोची विद्या व बुद्धि, आईकडील संपत्ति, धनधान्य, पशूंचे लाभ, कुटुंबांतील सुखाचा विचार, बापाची वाणी, अनेक प्रकारचे लाभ, ओळखी, परिचय, आश्रय, लोकसंस्था, आशा, आकांक्षा, महत्त्वाकांक्षा, नवीन कार्यांची योजना, परिस्थितींत बदल करणाऱ्या गोष्टी, द्रव्यासंबंधीं अनेक प्रकारच्या होणाऱ्या उलाढाली, देवघेव, भावंडें व आप्तवर्ग यांची भेट, बायकांच्या कुंडलींत सावत्र मुलें, यांचा अम्मल घोटे व पाय यांवर असतो.

द्वादशस्थान : —आयुष्यांत होणारा खर्च, खर्चाची भासणारी उणीव, कैद, दंड, राजकीय संकटें, ठकबाजी, धनहानि, कर्ज, आत्महत्या, गुप्तशत्रु, चोर, दरवडेखोर यांचेपासून होणारें नुकसान, भावंडांचा उद्योगधंदा, मुलांचे मृत्यु, चुलते, आत्या, बायकोचे आजार, पारलौकिक गति, एकांतवास, तुरुंगवास, अध्यात्म विद्या, मोठमोठाल्या व्याधि, कुटुंबविरोध, प्रवासापासून सुखदुःख, स्त्रीपासून होणारे रोग, मातुलविरोध, व्यसनें, विश्वासघात, मित्रांची वाणी, उजवा डोळा, नुकसान, मनुष्यहानि, उद्योगधंद्याची हानि, विवंचनात्मक परिस्थिति, विपत्ति, दुःख, शोक, द्वेष, छळ यांचा अम्मल पायांचीं बोटें व तळवे यांवर असतो.

---

७ लाभस्थानीं असलेला ग्रह कोणाकडून द्रव्यप्राप्ति दर्शवितो ?

रवि :—लाभस्थानीं रवि असेल तर पितृवर्गाकडून धनप्राप्ति होते.

चंद्र :—लाभस्थानीं चंद्र असतां मातृवर्गाकडून धनप्राप्ति होते.

मंगळ :—लाभस्थानीं जर मंगळ असेल तर मनुष्य स्वपराक्रमानें द्रव्य संपादन करितो.

बुध :—लाभस्थानीं बुध असेल तर आपल्या धन्याकडून अगर सूज्ञ मित्राकडून अर्थप्राप्ति होते.

गुरु :—लाभस्थानीं गुरु असेल तर वेदविद्येच्या योगानें व पुत्राकडून द्रव्यप्राप्ति होते.

शुक्र :—लाभस्थानीं शुक्र असेल तर काव्य, कलाकौशल्य, स्त्रियांचेकडून व गायनांत द्रव्यप्राप्ति होते.

शनि : —लाभस्थानीं शनि असेल तर शेतकी, दासदासी, धान्य यांपासून धनप्राप्ति होते.

---

८ व्यापारी-कारखानदार-स्वतंत्र धंदेवाईक

व्यापार हें राष्ट्राचें जीवन आहे, तेव्हां राष्ट्रांतील व्यापाऱ्याचे अंगीं कोणते गुण असावे लागतात किंवा कोणते गुण असले म्हणजे मनुष्य व्यापारी, कारखानदार अगर स्वतंत्र धंद्यांत वाकबगार होतो तें पाहूं.

(१) व्यापारी माणूस उत्साही असला पाहिजे. (२) व्यापारी माणसाला स्वप्नांतसुद्धां आळस उपयोगी नाहीं; किंबहुना आळस व्यापाऱ्यांचा कट्टा शत्रु असला पाहिजे. (३) व्यापारी माणसांनीं

काळवेळ पाहतां उपयोगी नाहीं. (४) व्यापारी माणसानें शृंगाररसांत गुरफटून व्यापाराकडे दुर्लक्ष्य करितां कामा नये. (५) व्यापाऱ्यानें सुंदर कपडे आहेत म्हणून श्रमाचें काम कसें करूं असें म्हणतां उपयोगी नाहीं. (६) व्यापारी माणसानें प्रेमपाशांत गुंतून धंद्याकडे दुर्लक्ष्य करितां उपयोगी नाहीं. (७) व्यापारी माणूस संपूर्ण निरोगी असला पाहिजे. व्यापाऱ्यांनीं शरिराची हेळसांड करितां कामा नये. (८) व्यापाऱ्याला निरनिराळ्या भाषांचें ज्ञान असावयास पाहिजे. (९) व्यापाऱ्याला प्रवास अवश्य आहे, त्याला कंटाळतां कामा नये. (१०) व्यापाऱ्याला समाजांत कोणता माल लागतो, तो केव्हां संपतो, यार्चे आवश्यक ज्ञान असावयास पाहिजे. (११) व्यापारी माणूस मोठा महत्त्वाकांक्षी असावयास पाहिजे. (१२) व्यापाऱ्यानें अधिक अधिक बुद्धीचा उपयोग वरचेवर करावयास पाहिजे. (१३) व्यापाऱ्यानें संकटाला धैर्यानें तोंड दिलें पाहिजे. (१४) व्यापारी धाडसी असावयास पाहिजे. (१५) भित्रा माणूस व्यापार करूं शकणार नाहीं. (१६) व्यापारी माणसाला व्यापारी तत्त्वाचा प्रामाणिकपणा जरूर पाहिजे. (१७) व्यापारी शब्दाचा सच्चा असावा. (१८) व्यापारी माणसानें आपली पत कांचेच्या भांड्यासारखी सांभाळली पाहिजे. (१९) व्यापारी गोड भाषण करणारा पाहिजे.

व्यापाऱ्याला लागणारे आवश्यक गुण वर दिलेले आहेत. आतां वर दिलेले गुण ज्यांचे अंगीं आहेत तोच व्यापार उत्तम करूं शकेल, अन्य मनुष्य करूं शकणार नाहीं.

जन्मकुंडलींतील सप्तमस्थान हें व्यापाराचें दर्शक आहे. सप्तमस्थानावरून व्यापारांत उत्कर्ष किंवा अधःपात होणार हें समजतें.

जन्मकुंडलींतील दशमस्थान हें उद्योगधंद्याचें द्योतक आहे व दशमार्चे दशमस्थान म्हणजे जन्मकुंडलीचें सप्तमस्थान होय.

व्यापार पहातांना दोन स्थानें प्रामुख्यानें विचारांत घ्यावयास पाहिजेत. एक सप्तमस्थान, दुसरें दशमस्थान.

चंद्रापासूनही सप्तमस्थान व दशमस्थान विचारांत घेतात. तसेंच रवी-पासूनही दशमस्थान व सप्तमस्थान विचारांत घेतात.

जन्मकुंडलींत सप्तमेश व दशमेश जेथें असतील तेथपासूनही त्याचें सप्तम व दशमस्थान विचारांत घ्यावयास पाहिजे.

जन्मकुंडलींत शनि, गुरु, मंगळ, शुक्र, बुध, चंद्र व लग्नाधिपति यांची स्थिति चांगली असावी.

सप्तमेश व दशमेश स्थानबली, शुभराशींत, शुभग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असावेत तसेंच ते पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट नसावेत.

सप्तमस्थानीं वृश्चिकराशी व दशमस्थानीं मेष, वृषभ, सिंह, धनुराशीचा उत्तरार्ध व मकरराशीचा पूर्वार्ध, या राशी बलवान् असतात.

सप्तमस्थानीं शुक्र व दशमस्थानीं रवि, बुध, गुरु, शनि हे त्या त्या स्थानचे कारक आहेत, तेव्हा याही ग्रहांची स्थिति व्यापाराचा विचार करितांना विचारांत घेणें अवश्य आहे.

कोणत्या राशीचे कोणते उद्योगधंदे आहेत ते पुढें दिले आहेत--

मेष :—मौल्यशान् वस्तूंचा व्यापार, दागदागिन्यांचा व कपडा-लत्त्यांचा व्यापार, मल्ल, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञानी, उत्तम लेखक, ग्रंथकार, लोक-शिक्षक, सार्वजनिक कामें करणारा, सुपरवायझर्स, म्यानेजर्स, डायरेक्टरर्स, अनेक धंदे करणारा, वारंवार धंदे बदलणारा, दंतवैद्य, पोलिस, सोल्जर, रेल्वे कामगार, खोदकाम करणारे.

वृषभ :—दुकानदार, कलाकौशल्याचीं कामें करणारा, विद्येविषयीं आस्था बाळगणारा, वैद्य, गाडी घोड्यांचा धंदा करणारा, जादूगार, पदार्थविज्ञान-शास्त्र जाणणारा, मजूर, न्हावी, कुंभार, स्वतंत्र धंद्यापेक्षां नौकरींत लक्ष्य ठेवणारा, ज्योतिषी, गवई, शेतकरी, तत्त्वज्ञानी, गणिती.

मिथुन :—राज्याधिकारी, वरिष्ठ अम्मलदार, प्रायश्चित्तासाठीं धर्मकृत्य करणारे, शेतकरी, शहररचना करणारे, बुकसेलर्स, लायब्रेरियन, बॉच-मेकर, दुभाषे, संशोधक, ॲडवरटायझिंग एजंटस्, व्यापारी, गुरें बाळग

णारे, गवई, सुगंधी पदार्थांचा धंदा करणारे, लेखक, खोटीं कामें करणारे, चोर, भुताटकीचे प्रयोग करणारे, गायन करणारे, वक्तृत्ववान्, नाना तऱ्हेंच्या गूढ तत्त्वांचे शोध लावणारे, स्वतंत्र धंद्यांत व शास्त्रीय विषयांत पारंगत, कवि, संपादक, डायरेक्टर, वकील, शिक्षक.

कर्क :—जनसेवा करणारे, रंगारी, चितारी, कवि, फोटोग्राफर, ग्रंथकार, शास्त्रज्ञ, गवई, कलाकौशल्य जाणणारे, कायदेपंडित, लेखक, धाडसाचीं कामें करणारे, चोर, ज्योतिषी, वँकर, कलेक्टर.

सिंह :—दिवाण, अधिकारी, फळफळावळ विकणारे, कोळी, विघारी वस्तूंचा व्यापार करणारे, औषधांचा साठा ठेवणारे, मारामारी करणारे, राजदंड भोगणारे, महत्पदाची इच्छा बाळगणारे. राजकीय घडामोडी करणारें, राजनीति जाणणारे, मुत्सद्दी, स्वातंत्र्यप्रिय, फंड उभारणारे, सार्वजनिक कामें करणारे.

कन्या :—नृत्यकला, व्यापारी, नैसर्गिक वस्तूंचा व्यापार करणारे, कलाकुशल, ग्रंथकार, वक्ता, कायदेपंडित, खाणीवाले, हायस्कूल शिक्षक, प्रोफेसर.

तूळ :—फळें विकणारे, कलाकौशल्याचीं कामें करणारे, विद्येचे चाहते, व्यापारी, रंगारी, लढवय्ये, युक्तीबाज, शस्त्रक्रिया करणारे, विणकर, लेखक, मुद्रक, अत्तराचे शोकी, रत्नांचे व्यापारी, गूढ शास्त्र जाणणारे, कारागीर, तात्त्विक ग्रंथकर्ता, व्यापारांत वाकबगार, वाहनांचा परीक्षक, दलाल, सट्टेवाले, पिंजारी, मोत्यांचे व्यापारी, नृत्यकुशल, कवि, पोहण्यांत वाकबगार, शिकारी, खेळाडू, क्रिकेटियर, सोन्याचे खाणींत काम करणारे.

वृश्चिक :—भुसार मालाचे व्यापारी, फिरते एजंट, गाडी—घोड्यांचा धंदा करणारे, दारुमक्तेदार, कसान, केमिस्ट आणि ड्रगिस्ट, नर्स, जहाजावरील कसान, राजकारणी, तंबाखु, तपकीर, विडया, सिगारेटचा व्यापार करणारे, फॉरेस्ट खात्यांत काम करणारे.

धनु :—मेस्मिरिझम, हिप्नॉटिझमचे प्रयोग करणारे, औषध विकणारे, फुलांचे व फळांचे व्यापारी, बागबगीचा करणारे, लढवय्ये, व्यापारी, कारखानदार, रेल्वे एजंट, भविष्यवादी, गणित ज्योतिषी, ॲक्टर्स, संशोधक, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, दिवाण, ब्यांकर, म्यानेजर, कारभारी, संस्थानिक, चीफ ऑफिसर, न्यायाधीश, रत्नपारखी.

मकर :—मारामाऱ्या, जाळपोळ करणारे, विषप्रयोग करणारे, मोठमोठ्या उलाढाली करणारे, परदेशी मालाचा व्यापार करणारे, कारखानदार, चोर, दरोडेखोर, छापखानावाले, लोखंडाचे व्यापारी, कॉन्ट्रॅक्टर, वॉच मेकर.

कुंभ :—गाणारे, वाद्य वाजविणारे, वैमानिक, संशोधक, वकील, फ्रेम मेकर, शिंपी, टिनचीं कामें करणारे, मूर्तिकार, व्याकरण-शास्त्रज्ञ, मांत्रिक, फिरस्ते, ज्योतिषी, स्वयंसेवक, गवंडी, वेश्या.

मीन :—कोळी, धोबी, मासे मारणारे, पक्षी पाळणारे, जुगारी, धनगर, चोर, कायदेपंडित, नावाडी, पाणके, गवळी, पाणवुडे, खलाशी, इरिगेशन खात्यांतील नौकर.

व्यापाराचा विचार करीत असतांना बुध शुक्राला प्रामुख्यानें विचारांत घ्यावे व सर्व साधारण गोष्टींचा सारासार, विचार करून फलें ठरवावीं.

---

९ निरनिराळ्या ग्रहांचे धंदे

रवि :—राष्ट्रांतील पुढारी, मोठमोठे अधिकारी, सिव्हिल सर्जन, सत्ताधीश, हुद्देदार, वरिष्ठ नौकरी, विद्युत् आणि प्रकाशाशीं संबंध असलेले व विजेनें चालणारे सर्व धंदे, जवाहिर विकणारे, सोनें विकणारे, गिल्लिट काम करणारे, सावकारी, प्रवासी एजंट, लेखक, शेतकी, प्रेतकार्य, शृंग, चामरादि चिन्हें, सेवा, दुर्जनकर्म, वैद्यकी, मोठमोठाल्या संस्थांचे अध्यक्ष,

उपाध्यक्ष, सत्ताधारी लोक, राजमंडळांतील लोक, वैद्यक शास्त्र, आरोग्याधिकारी, प्रामाणिक कामें करणारे, अत्यंत श्रीमान्, न्याय देणारे, उन्नतीच्या शिखरावर पोहोंचलेले, राज्यांतील मोठमोठ्या हुद्द्यांवर असलेले लोक, राजाचा पक्ष घेणारे, नियमित काम करणारे, तांबुस, तपकिरी, नारिंगी, रंगांच्या वस्तूंचा व्यापार करणारे, गांवचा सत्ताधीश अधिकारी.

चंद्र :—पाण्याशीं संबंध असलेले धंदे, दुकानदार, रेल्वे व पोष्ट कामगार, ज्योतिषी, सुगंधी पदार्थ, चैनीच्या वस्तू, खलाशी, मुशाफरी, किरकोळ धंदे करणारे, सुईणी, पाणके, फळें आणि भाज्यांचा व्यापार करणारे, स्त्रियांचें काम करणारे, आचारी, स्त्रिया किंवा संस्थानिक स्त्रियांचे खाजगी कारभारी, सार्वजनिक संबंध ज्यावरोवर येतो असे धंदे, चंद्र बलवान् असतां द्रव्यलाभ होण्याचा मार्ग– शंखादिक्रयविक्रय, मैथुन, स्त्रीमैत्री, राजपुरुषमित्रता, धनलाभ, कृषिकर्म, वस्त्रादि व्यापार, ब्राह्मणविरोध, सोत्कर्षहानि, स्वदेशद्रव्यबलादि हानि, फंड, जलप्रवासी, सुगंधी पदार्थ व चैनीच्या वस्तूंचे व्यापारी, ड्रायव्हर, गाडीवान, पातळ पदार्थांचा क्रयविक्रय करणारे, प्रजेचा पक्ष घेणारे, सार्वजनिक कामांत मदत करणारे, परीट.

मंगळ :—कॉंट्रॅक्टर, डॉक्टर, जमीनदार, पोलीस अधिकारी, इंजिनियर, मिलिटरी खात्यांत काम करणारे, सेनापति, लोखंडी सामानाच्या शस्त्रांचा व्यापार करणारे, चोर, दरोडेखोर, कैदी, शिपाई, वैद्य, रसायनशास्त्रज्ञ, दंतवैद्य, खाटिक, आचारी, लोहार, कल्हई करणारे, अग्नीवर उपजीविका करणारे, भट्ट्या लावणारे कुंभार. मंगळावरून द्रव्य मिळविण्याचा मार्ग– सुवर्णसिद्धिजय, वस्त्रलाभ, मित्रसमागम, बंधुविवाह, शत्रुकर्म, स्त्रीविषयक चांचल्य, स्त्रीलाभ, दासलाभ, सर्व इच्छा, अचाट बुद्धिमत्तेचीं कामें, धनुर्विद्या व धातुविद्या शास्त्र जाणणारे, पहिलवान, पोलिसखात्याशीं संबंध असलेले, सोनार, ज्याचा ज्याचा संबंध, अग्नि व धारवान हत्यारें यांच्याशीं येतो असे धंदे, न्हावी.

बुध :—शिक्षक, हिशेबी, लेखक, बुकसेलर्स, वर्तमानपत्रकार, स्वतंत्र धंदा, संपादक, अकॉउंटंट, सेक्रेटरी, रजिस्ट्रार, जासूद, प्रिंटर्स, छापखानदार, पोस्टमन, सामान्य नौकऱ्या, व्यापारी, उत्पन्नदार, किरकोळ धंदे, ग्रंथकार, गणित शास्त्रज्ञ, ग्रंथ प्रकाशक, परराष्ट्रीय वकील, खाजगी कारभारी, सराफीचा धंदा करणारे, ज्योतिषी, देशांतील चळवळीचे पुढारी, प्रचारक, वकील, मध्यस्थी करणारे. बुधाचे द्रव्यलाभाचे मार्ग अनेक आहेत, शुक्रस्थानीं बलवान असल्यास—विद्येच्या योगानें, स्त्रियांकडून, पैशाचे देवघेवीमध्यें, शेती, दासदासीकडून, भावांकडून, देशांतरकरून, शिल्पकर्म, राजस्त्रीद्वारा, वस्त्रांचा व्यापार, धान्याचा व्यापार, सुवर्णाचा व्यापार यांमध्यें द्रव्यलाभ होतो.

गुरु :—सल्लागार, वकील, राजकारणी, प्रधान, वारकरी, साधु, न्यायाधीश, पुढारी, मुलकी अम्मलदार, ठेवी ठेवणारे, सराफी, देवघेवीचा धंदा करणारे, मोठमोठाल्या पेढ्या काढणारे, श्रीमंत व्यापारी, जहागिरदार, दिवाण, संस्थानिक, सोन्याचे व्यापारी, धर्मगुरु, धर्मशास्त्रपारंगत, धर्मशास्त्री, लोंकरीच्या कपडयाचे कारखानदार, धान्यादि भुसार मालाचे व्यापारी. गुरु बलवान् असल्यास—गुणवान्, विद्यावान्, गर्भ श्रीमंत-सुखी, पुत्रमित्रांकडून धनप्राप्ति, मंत्री, अध्यापक, प्राध्यापक, प्रोफेसर्स, जज्ज, कायदे करणाऱ्या लोकसभेंत काम करणारे, कौन्सिलर, प्रिन्सिपांल, खजिनदार, स्टोअरकीपर, जामदारखान्यांतील मुख्य अधिकारी, भांडारखान्याचे मुख्य अधिकारी, राजमान्य जोशीपणा करणारे.

शुक्र :—सुगंधी सामानाचे व्यापारी, कापडाचे व्यापारी, चैनीच्या पदार्थांचे व्यापारी, सोन्याचांदीचे व हिरेमाणकें, जडजवाहिऱ्यांचे व्यापारी, नाटकी, खजिनदार, खाजगीकारभारी, इस्टेटीचा धनरक्षक, इंद्रजाल, राजाश्रयी, स्वतंत्रविद्या, अमृतसिद्धि, यांत्रिक विद्या, गाईम्हशी, जनावरें, इत्यादिकांचा व्यापार करणारे, मंत्रजाळ, जारण, मारण, उच्चाटन, चमत्कार विद्या, वशीकरण, व्यापारी, देवघेव, मोतीं, कांदे, कापूस, ज्वारी,

तांदूळ, चांदी, शेअर्स वगैरेचा धंदा करणारे, पांढऱ्या वस्तूंचे व्यापारी, सट्टेबाज, सेनाधिकारी, शेती, गार्णेबजावर्णे, शर्यती, जुगारी, गवई, गाणाऱ्या स्त्रिया, रंगकाम करणारे पेंटर्स, कवि, नट, नायकिणी, स्त्रीपार्टी, सर्व प्रकारचे कुशल कारागिरीचें काम करणारे, हलवाई, मिठाई विक्रणारे, दासी, नौकर, दारूचे कॉन्ट्रॅक्टर, सुतार, गुरव.

शनि :—गुप्तपोलिस, कारस्थान करणारे, गुप्तकार्य करणारे, कटवाले, सी. आय. डी. खात्याशीं संबंध असलेले नौकर व अधिकारी, मोठ्या कारखान्याचे मालक, चालक, शेतकी, बागाईत करणारा, छापखानदार, नौकरी करणारा, मजूरवर्ग, शारीरिक कामें करणारे, शेतकरी, जमिनदार, खाणी, खनिजपदार्थ, दुष्टपणाचीं कारस्थानें, चोर, ठकबाजी, खोटें बोलणारे, म्हशी पाळणारे, कोळशाचे दुकानदार, लहान लहान हलके धंदे करणारे, काळ्या वस्तूंचा व्यापार करणारे, दास्यत्व करणारे, फॉरेस्ट खात्याशीं संबंध असलेले, कोळशाच्या खाणींत काम करणारे, हीन धंदे करणारे, घरचे खाऊन लष्करची भाकरी भाजणारे, कायद्याची आवड असणारे, लोखंडी सामानाचे व्यापारी, चर्मकार, अगदीं हलक्यांत हलक्या दर्जाचा नौकर, सेवक.

---

१०. कॉन्ट्रॅक्टमध्यें फायदा कोणाला होतो.

जो मनुष्य कॉन्ट्रॅक्ट घेऊन पैसे मिळवितो, त्याच्या कुंडलींत खालील योग दृष्टीला पडतील किंवा ज्याचे कुंडलींत खालील योग असतील त्याला कॉन्ट्रॅक्टमध्यें फायदा होतो.

साधकबाधक गोष्टींचा विचार करून, कोणता माल कोठें मिळतो, त्याचा भाव काय आहे, आपणाला तो केवढ्याला व्यावयास परवडेल, अगर अंगावर घेतलेलें कोणतेंही काम, आपण किती किंमतींत पुरें करून देऊं याचा कॉन्ट्रॅक्टरला अगोदर अंदाज घ्यावा लागतो.

कॉन्ट्रॅक्टमध्यें प्रवृत्त करणारे ग्रह रवि, शुक्र, चंद्र, बुध, आणि मंगळ हे होत.

मंगळाची स्थिति फारच जोरदार असावी लागते. कारण, मंगळ जर जोरदार असेल तरच तो मनुष्य धाडसाचीं कामें करणारा, बेदरकार, निधडया छातीचा आणि बेफिकीर वृत्तीचा असतो.

(१) मंगळ तिसऱ्या, सहाव्या, दहाव्या आणि अकराव्या ठिकाणीं जोरदार असतो.

(२) तृतीयस्थानीं मेषेचा मंगळ असून सप्तमांत किंवा एकादशांत शुक्र असेल तर कॉन्ट्रॅक्टमध्यें फायदा होतो.

(३) मंगळ शुक्र, मंगळ चंद्र, मंगळ बुध, मंगळ रवि, या ग्रहांचा शुभयोग कॉन्ट्रॅक्टमध्यें फायदा दर्शवितो.

(४) मेष, वृश्चिक, मकर या कॉन्ट्रॅक्टमध्यें फायदा दर्शविणाऱ्या राशी आहेत.

(५) ज्यांचे कुंडलींत या राशी द्वितीयांत, पंचमांत, नवमांत, लाभांत, सप्तमांत अगर दशमांत असतील त्यांना कॉन्ट्रॅक्टमध्यें फायदा होतो.

---

११. गोचरीचे कोणते ग्रह धनयोगाला पोषक असतात.

जन्मकुंडलीला अगर राशीकुंडलीलाः—रवि– ३ रा व १२ वा आला असतां. चंद्र– २ रा, ३ रा, ६ वा, ७ वा, ११ वा. मंगळ– ३ रा व ६ वा. बुध– २ रा, ४ था, ६ वा, ८ वा, १० वा व ११ वा. गुरु– २ रा, ५ वा, १० वा व ११ वा. शुक्र– २ रा, ३ रा, ११ वा व १२ वा. शनि– ३ रा व ११ वा. राहू– ३ रा व ६ वा. केतु– ६ वा.

वर दिलेले ग्रह गोचरीनें आले असतां मनुष्याला सांपत्तिक लाभ देतात. अर्थात् ज्यामानानें ते जन्म कुंडलींत असतील त्यामानानें कमी अधिक लाभ होतील. धन देणाऱ्या स्थानांतून धन देणारी राशी असेल आणि त्याच ठिकाणीं धन देणारा ग्रह येईल आणि तो जर जन्म कुंडलीला शुभफल देणारा अगर धन देणारा ग्रह असेल आणि त्याच्यावर शुभग्रहाची दृष्टि असेल तर निःसंशय सांपत्तिक लाभ घडून द्रव्यप्राप्ति होईल.

---

१२. ग्रहांचा उदयकाल.

जन्मकालच्या ग्रहांच्या बलाबलाप्रमाणें ग्रह आपल्या उदयकालीं विशेष चांगल्या प्रकारचें फल उत्पन्न करितात. जन्मकालीं जो ग्रह बलवान् असेल तो ग्रह त्याचा उदय झाला म्हणजे शुभफल उत्पन्न करितो. तो ज्या स्थानचा अधिपति असेल तें स्थान ज्या ज्या गोष्टींचें दर्शक असेल त्या त्या गोष्टी मनाप्रमाणें घडतात; तो काल, सुखावह किंवा आनंदाचा जातो.

उलटपक्षीं तोच ग्रह अनिष्टफल उत्पन्न करणारा असल्यास अगर अशुभस्थानाचा अधिपति असल्यास उत्कर्षाला विघातक गोष्टी घडतात संकटें, दुःख, त्रास, हालअपेष्टा भोगाव्या लागतात.

तेव्हां कोणत्या ग्रहाचा कोणत्या वर्षी उदय होतो व त्याचा कोणत्या वर्षांत बरा अगर वाईट परिणाम भोगावा लागतो हें समजण्याकरितां ग्रहांचे उदयकाल खालीं देत आहेः—

गुरुः— वयाचे १६ वे वर्षी उदय पावतो व तो वय वर्षे १६ ते २२ पर्यंत फल देतो.

रविः— वयाचे २२ वे वर्षी उदय पावतो व तो वय वर्षे २२ ते २४ पर्यंत फल देतो.

चंद्रः— वयाचे २४ वे वर्षी उदय पावतो व तो वय वर्षे २४ ते २५ पर्यंत फल देतो.

शुक्रः— वयाचे २५ वे वर्षी उदय:पावतो व तो वय वर्षे २५ ते २८ पर्यंत फल देतो.

मंगळः— वयाचे २८ वे वर्षी उदय पावतो व तो वय वर्षे २८ ते ३२ पर्यंत फल देतो.

बुधः— वयाचे ३२ वे वर्षी उदय पावतो व तो वय वर्षे ३२ ते ३६ पर्यंत फल देतो.

शनिः— वयाचे ३६ वे वर्षी उदय पावतो व तो वय वर्षे ३६ ते ४२ पर्यंत फल देतो.

राहूः— वयाचे ४२ वे वर्षी उदय पावतो व तो वय वर्षे ४२ ते ४८ पर्यंत फल देतो.

केतू :—वयाचे ४८ वे वर्षी उदय पावतो व तो वय वर्षे ४८ ते ५२ पर्यंत फल देतो. आणि वयाच्या ५२ वर्षांचे पुढें शेवटचीं सगळीं वर्षे शनि फल देतो.

ग्रह फक्त उदयकालींच फल देतात व इतर वेळीं देत नाहींत असें कोणीही समजूं नये.

ग्रहाचा उदय झाल्यानंतर त्याचें बरें अगर वाईट फल तर मिळतेंच परंतु उदयकालानंतर शेवटपर्यंत तो ग्रह ज्या ज्या वेळीं चांगला येईल त्या त्या वेळीं त्याचे विशेष प्रकारचें चांगलें अगर वाईट फल जसा असेल त्याप्रमाणें अनुभवास येईल.

एकादा ग्रह अनिष्ट असेल तर त्याचा उदय झाल्यावर सर्वच काळ वाईट जाईल असें नाहीं तर तो जें अनिष्ट फल उत्पन्न करितो त्या काळांत विशेष तीव्रतेनें त्याचे परिणाम दिसतात.

जन्मकुंडलींत एकादा ग्रह अनिष्ट असेल आणि तो उदय पावला परंतु त्याचवेळीं गोचरीनें तो ग्रह जर चांगला येत असेल तर त्याचे अनिष्ट परिणाम बऱ्याच अंशानें कमी होतील.

ज्या वेळीं जन्मकुंडलींत एकादा ग्रह चांगला असेल व त्या ग्रहाचें त्या जन्मकुंडलींत शुभ फल उत्पन्न होत असेल आणि तो जर गोचरीनें चांगला येत असेल आणि त्याचवेळीं त्याचा उदय होत असेल तर त्याचें निःसंशय चांगलें फल मिळेल. तो ज्या स्थानचा अधिपति असेल आणि तें स्थान ज्या ज्या गोष्टींचें द्योतक असेल त्या त्या गोष्टीसंबंधीं शुभ फल मिळतें.

जन्मकालापासून पहिलीं आठ वर्षें अष्टमाधिपतीवरून व वय वर्षें ८ ते १६ लग्नाधिपतीवरून विचारपूर्वक फल निर्णय करावा.

वरील सांगितलेल्या गोष्टींचा सारासार विचार करून ग्रहांच्या उदय-कालाचा निर्णय करून फलित वर्तवावें.

---

१३. सासऱ्याकडून धनप्राप्ति

पुष्कळ वेळां अनेक माणसांकडून, सासऱ्याकडून द्रव्य प्राप्ति होईल कीं नाहीं असें विचारण्यांत येतें. तेव्हां जे सासरे जांवयाला द्रव्य देतात, हुंडा देतात किंवा मुलीचें सालंकृत कन्यादान करून देतात अगर एकुलती एक मुलगी असून जर घरची लाखों रुपयांची इस्टेट असेल तर जांवयाला घरजांवई करितात, अशा वेळीं ज्या ज्या माणसाला वरील प्रकारामुळें सासऱ्याच्या धनाचा अगर बायकोच्या माहेरच्या दौलतीचा भाग मिळतो तेव्हां त्या माणसाच्या जन्मकुंडलींत कोणत्या प्रकारचीं ग्रहपरिस्थिति असते याचा आपण विचार करूं, अगर कोणते ग्रह सासरची इस्टेट देण्यास कारणीभूत होतात तें पाहूं.

आपणांस एखादा विशेष प्रकारचा लाभ होईल किंवा नाहीं हें जेव्हां पाहावयाचें असतें, तेव्हां आपला भाग्ययोग किती महत्त्वाचा आहे हें प्रथम नीट पाहिलें पाहिजे. नंतर लग्नकुंडली व चंद्रकुंडली या दोन्ही विचारांत घेतल्या पाहिजेत. आणि या दोन्ही कुंडलींत भाग्ययोग नसला तर बहुतकरून लाभ होतच नाहीं. यदाकदाचित् झाला तर तो अल्प-स्वल्प प्रमाणांतच होईल असें समजावें.

दारिद्र्ययोगापेक्षां भाग्ययोग बलवान् असावा लागतो. श्वशुराकडून प्राप्त होणाऱ्या धनाचा विचार करितांना जन्मकुंडलींतील जाया स्थान म्हणजे सातवें स्थान व कुटुंबस्थान म्हणजे दुसरें स्थान हीं दोन स्थानें प्रामुख्यानें विचारांत घेतलीं पाहिजेत.

दुसरे आणि सातवे स्थानाचे असे एकच अधिपति फक्त मंगळ व शुक्रच असूं शकतात. मेष लग्न असतांना जाया व कुटुंब म्हणजे दुसरे व सातवे स्थानाचा मालक शुक्र असतो व तूळ लग्न असतांना द्वितीयेश व सप्तमेश मंगळ असतो.

(१) जर द्वितीयेश आणि कुटुंबेश एक असतील तर स्त्रीकडून प्राप्त होणाऱ्या धनाकडून उदरनिर्वाह होईल असें समजावें.

(२) जर द्वितीयेश आणि कुटुंबेश भिन्न असतील तर निर्वाह न होतां नुसती धनप्राप्ति होईल असें समजावें. मात्र द्वितीयेश आणि सप्तमेश हे खालील योगांत असावे लागतात.

(३) जाया आणि कुटुंबस्थानचे अधिपति एकच असून ते जाया-स्थानीं अगर कुटुंबस्थानीं एकत्र असले म्हणजे सासऱ्याकडून धन-प्राप्ति होते.

(४) दुसऱ्या स्थानाचा स्वामी सप्तमस्थानीं व सप्तमस्थानचा स्वामी जायास्थानीं असतांना धन मिळतें.

(५) दुसऱ्या अगर सातव्या स्थानचे स्वामी दुसऱ्या अगर सातव्या स्थानीं एकच असतांना धनप्राप्ति होते.

(६) द्वितीयेश व सप्तमेश प्रथम, चतुर्थ, पंचम, सप्तम, नवम, दशम आणि एकादशस्थानीं असतांना म्हणजे केंद्रांत किंवा त्रिकोणांत असतांना धनप्राप्ति होते.

(७) तसेंच चंद्राच्या द्वितीयांत किंवा सप्तमांत जन्मकुंडलीतील द्वितीयेश किंवा सप्तमेश असल्यास स्त्रीच्याकडून धनप्राप्ति होते.

(८) अष्टमेश लाभांत किंवा द्वितीयांत असतांना स्त्रीच्याकडून डा मिळतो.

(९) राशीकुंडलींत म्हणजे चंद्राच्या अष्टमस्थानचा अधिपति द्वितीयांत अगर लाभांत किंवा पंचमांत वा नवमांत असेल तरीसुद्धां द्रव्य मिळण्याची आशा असते. वरील एकंदर विवेचनावरून मनुष्याला स्त्रीकडून धनप्राप्ति होण्यास कोणती ग्रहपरिस्थिति कारणीभूत होते याचें विवेचन केलें आहे.

---

१४. स्त्रियांचेकडून धनप्राप्ति

पुष्कळांना नेहमीं असें वाटतें कीं आपल्या नशिबांत कांहीं स्त्रीधन आहे किंवा नाहीं. तेव्हां कुंडलींत, स्त्रियांचेकडून धनप्राप्ति आहे कीं नाहीं तें खालील गोष्टींवरून ठरवावें. मग ती स्त्री, आई, आजी, चुलती, मावशी, बायको असो अगर अन्य कोणी स्त्री असो याचा सारासार विचार करून ठरवावें.

(१) जन्मकुंडलींत सप्तमस्थान हें स्त्रीकारक स्थान आहे.

(२) शुक्र व चंद्र हे स्त्रीकारक ग्रह आहेत.

(३) सप्तमेश धनस्थानीं असतां स्त्रीकडून धन मिळतें.

(४) सप्तमेश नवमांत असतां स्त्री भाग्योदयाला कारणीभूत होते.

(५) सप्तमाधिपतीबरोबर लाभाधिपति योग करीत असेल आणि त्याच्यावर पापग्रहाची दृष्टि नसेल आणि शुभग्रह पाहात असतील तर स्त्रीकडून धनप्राप्ति होते.

(६) सप्तमेश आणि अष्टमेश यांचे शुभसंबंध असतां चुलती किंवा मावशी यांचेकडून धनप्राप्ति होते.

(७) लग्नस्वामी बलवान् असून, धनस्वामी हा सप्तमाधिपतीबरोबर आणि शुक्राबरोबर युत किंवा दृष्ट असेल तर स्त्रीपासून धनप्राप्ति होते.

(८) दशमांत बलवान् शुक्र असून तो शुभ संबोधित अगर शुक्र ग्रहानें दृष्ट असेल तर स्त्रियांपासून द्रव्यलाभ घडतो.

(९) दशमांतील शुक्र चंद्राबरोबर शुभ संबोधित असेल तर स्त्रीकडून अनेक प्रकारचे द्रव्यलाभ होतात.

(१०) पंचमाधिपति आणि अष्टमाधिपति यांच्यांत शुभयोग असेल आणि सप्तमाधिपति पापग्रहानें दूषित नसेल तर स्त्रीकडून धनप्राप्ति होतो.

(११) द्वितीयाधिपति व अष्टमाधिपति यांचेबरोबर लग्नाधिपति व सप्तमाधिपति शुभयोग करीत असतील तरी सुद्धां स्त्रियांचे कडून धनप्राप्ति होते.

येणेंप्रमाणें विचार करून मूळ धनयोग पाहून भविष्य वर्तवावें.

---

१५. शर्यती

ज्या वेळीं मनुष्य शर्यत (रेस) खेळतो त्यावेळीं धनयोग किंवा धनहानि या दोहोंपैकीं एक गोष्ट निश्चित होते. शर्यतीमध्यें पैसा मिळावयाचा असल्यास तो जन्मकुंडलींत शर्यतींत पैसा मिळण्याचा धनयोग असला पाहिजे. जर जन्मकुंडलींत योग नसेल तर धनहानीच समजावी. शर्यतीमध्यें पैसे किती मिळणार याचा कोणालाच अगोदर अंदाज नसतो.

हजारों माणसें शर्यती खेळतात परंतु शेवटीं पुष्कळांना हात हालवीतच घरीं परत यावें लागतें. कांहींना जुजवी फायदा होतो. कांहींना फायदा झाला नाहीं तरी विनाकारण खर्चाची झीज चैनीकरितां सोसावी लागते.

एवढ्याकरितां प्रथम आपल्या जन्मकुंडलींत शर्यतीपासून फायदा आहे कीं नाहीं, असल्यास तो कोणच्या वर्षीं आहे याचा परिपूर्ण विचार करून जर पुढें पाऊल टाकिलें तर पश्चात्ताप करण्याची पाळी येणार नाहीं.

तेव्हां खालील योग आपल्या जन्म किंवा राशी कुंडलींत आहेत कांय यांचें बारकाईनें निरीक्षण करून मगच शर्यती खेळाव्यात, नाहींपेक्षां विनाकारण या नसत्या फंदांत पडूं नये.

(१) जन्मकुंडलींत अगर राशी-कुंडलींत रवि तिसऱ्या, सहाव्या, आठव्या, अकराव्या ठिकाणीं असल्यास त्या मनुष्याला रेसपासून फायदा होतो.

(२) किंवा रवि जर दुसऱ्या स्थानीं, किंवा पंचमस्थानीं असेल तर शर्यतीपासून जुजबी फायदा होतो.

(३) नुसता रवीच वरील स्थानीं असून भागणार नाहीं तर ज्या वरील सांगितलेल्या स्थानीं रवि असेल आणि जर रवीबरोबर चंद्र लाभयोग किंवा नवपंचमयोग करीत असेल तरच फायदा होतो.

(४) जसा चंद्राचा रवीबरोबर शुभयोग पाहिजे तसा लग्नाधिपतीचाही शुभयोग अवश्य पाहिला पाहिजे.

(५) केंद्र त्रिकोणाचे स्वामी पंचमस्थानीं असतांना शर्यतींत फायदा होतो.

(६) शिवाय ६–८–१२ या स्थानीं पापग्रह असूं नये.

(७) केंद्र त्रिकोणाचा अधिपति पंचमांत असतांना व लग्नांत तृतीयांत, सप्तमांत, नवमांत, एकादशांत, जर शुभ ग्रह असतील आणि ६–८–१२ या ठिकाणीं पापग्रह नसतील तर शर्यतींत फायदा होतो.

(८) तृतीयांत शनि असून त्यावरोवर राहु शुभयोग करीत असेल तर त्या माणसाला शर्यती, लॉटरी, कोर्डी यांमध्यें वयाच्या ३२ किंवा ३५ वे वर्षी धनलाभ होतो.

(९) तृतीयांत शनि, राहु असतांना शर्यतींत पैसा मिळविण्याची आशा धरूं नये.

---

१६. लॉटरी

ज्या माणसांना आपणाला लॉटरींत फायदा आहे कीं नाहीं हें पाहावयाचें असेल त्यांनीं जन्मकुंडलींतील पंचमस्थान व अष्टमस्थान हीं दोन्हीं स्थानें अवश्य पाहिलीं पाहिजेत.

या ठिकाणीं एक गोष्ट नमूद करणें अत्यंत जरूर वाटतें कीं, जन्मकुंडली किंवा राशी कुंडली यांपैकीं जी जोरदार असेल त्याच कुंडलींतील पंचमस्थान व अष्टमस्थान पहावें.

लॉटरींत फायदा होणाऱ्या माणसाचें अष्टमस्थान व पंचमस्थान अत्यंत जोरदार असलें पाहिजे.

अष्टमस्थानीं शुक्र, योगवली, उच्चीचा, स्वक्षेत्रीं अत्यंत फायदेशीर होतो.

पंचमांत, गुरु, शुक्र, बुध, रवि, मंगळ, शनि, चंद्र स्वक्षेत्रीं, उच्चींचे असल्यास लॉटरींत फायदा होतो.

लॉटरीचा विचार करावयाचा झाल्यास अष्टमस्थान, पंचमस्थान व नैसर्गिक लाभस्थान व धनस्थान या स्थानांचा विचार अवश्य करावयास पाहिजे.

(१) जर सिंह, तूळ, मीन या राशींचें लग्न असून शुक्र अष्टमस्थानीं दशवर्गी बलिष्ठ असल्यास लॉटरींत मोठा लाभ होतो.

(२) मिथुन, वृश्चिक, मकर या लग्नीं शुक्र जर पंचमस्थानीं असेल तर लॉटरींत फायदा होतो.

(३) मेष, कन्या, कुंभ लग्न असतांना शुक्र द्वितीयस्थानीं असल्यास लॉटरींत लाभ दर्शवितो.

(४) वृषभ, कर्क, धनु लग्न असतांना एकादशस्थानीं शुक्र, लॉटरींत द्रव्यप्राप्ति दाखवितो.

(५) अमृतस्थानीं, पंचमस्थानीं, लाभस्थानीं आणि धनस्थानीं कोणताही ग्रह उच्च अगर स्वग्रहींचा असल्यास लॉटरींत विशेष फायदा होतो.

(६) अष्टमेश व पंचमेश यांची युति लॉटरीला पोषक असते.

(७) अष्टमेश पंचमांत व पंचमेश अष्टमांत असतांना लॉटरींत लाभ होतो.

(८) अष्टमेश धनांत व धनेश अष्टमांत असतांना लॉटरींत फायदा होईल असें समजावें.

(९) अष्टमेश लाभांत व लाभेश अष्टमांत असतांना मुद्दां अचानक द्रव्यलाभ होतो.

(१०) धनेश लाभांत व लाभेश धनांत हा योगही अकल्पित धन-लाभ दर्शवितो.

(११) अष्टमेश पंचमांत, धनांत, किंवा लाभांत असणें अत्यंत फायदेशीर आहे. मात्र पंचमस्थान जोरदार पाहिजे.

यावरून ज्यांच्या कुंडलींत वरील योग जोरदार आहेत अशांनाच लॉटरीपासून अचानक धनलाभ होतो. याखेरीज इतरत्रांनीं या फंदांत पडूं नये.

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY,
Jangamwadi Math, VARANASI
Acc. No. ... 3743

१७. दत्तकयोग

विपन्नावस्थेंत असलेला मुलगा दत्तक गेल्यामुळें लक्षावधि रुपयांचा वा कोट्यावधि रुपयांचा किंवहुना एकाद्या राज्याचा मालक झालेला दृष्टीला पडतो व त्याच्या आयुष्यांत एकदम मोठी क्रांति होते.

वडिलोपार्जित अगर वडिलार्जित इष्टेट कांहींही नसतांना केवळ दत्तक गेल्यामुळें आपला कोणत्याही प्रकारें हक्क नसलेली इष्टेट कोणच्या कारणामुळें प्राप्त होते. तें पाहूं.

दत्तकयोगाचा विचार करितांना दशमस्थान व चतुर्थस्थान याचा अवश्य विचार करावयास पाहिजे.

त्याचप्रमाणें लाभस्थान व पंचमस्थान हींही स्थानें विचारांत घेणें जरूर आहे.

म्हणजे दहावें व अकरावें आणि .चवथें व पांचवें ह्या स्थानांवर विचार करावा.

एकादा मनुष्य दत्तक गेल्यास त्याच्या कुंडलींत खालील योग पहावे अगर खालील योग असलेल्या कुंडलीच्या मालकाला दत्तक जाण्याचा योग येतो.

(१) मेष, सिंह, धनु, कर्क, मकर आणि कुंभ या राशी दत्तक माणसाच्या कुंडलींत—जन्म-कुंडली अगर राशी कुंडलींत—चतुर्थस्थानीं किंवा दशमस्थानीं असलेल्या दृष्टीला पडतात.

(२) चतुर्थस्थानीं पापग्रह अगर शनि असल्यास दत्तकयोग घडतो.

(३) चंद्रापासून चतुर्थस्थानीं अगर दशमस्थानींही पापग्रह असतात.

(४) चंद्र किंवा रवि पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असतात.

(५) रवीपासून नवमस्थानीं अगर दशमस्थानीं शनि, मंगळ, राहु असल्यास अगर कोणताही एक ग्रह असल्यास दत्तकयोग घडण्याचा संभव असतो.

(६) लग्नेश बलवान् परंतु रवि दशमस्थान व पंचमस्थान हीं विघडलेलीं असून शनि व मंगळ जोरदार असल्यास दत्तकयोग होतो.

---

१८. सट्टे आणि शेअर.

आजकाल सट्टे खेळण्याकडे, शेअर घेण्याकडे, अगर वायद्याचा व्यापार करण्याकडे पुष्कळांचें लक्ष आहे. सट्टे अगर शेअरबाजारांत जा. तुम्ही तेथला व्यवहार पाहात असतांना तुम्हांला तेथील लोक, श्रीमान् तर दिसतीलच, परंतु निघडया छातीचे, साहसी, धाडसी, विलक्षण महत्त्वाकांक्षी, अशा निरनिराळ्या प्रकारचीं माणसें दृष्टीला पडतील.

तेथील सूक्ष्म परिस्थितीचें सिंहालोकन केलें तर तुमच्या निदर्शनास अर्से येईल कीं, क्षणांत रंकाचा राव नाहींतर रावाचा रंक बनतो.

तेव्हां सट्टे, शेअर आणि वायद्याचा व्यापार करणाऱ्या माणसांच्या कुंडलींत ग्रह परिस्थिति कशी असावी लागते म्हणजे फायदा होतो नाहीं तर त्या मार्गांत जाऊन नुकसानीच सोसावी लागते.

जन्म कुंडलींत पुढील योग झाले म्हणजे माणसाची प्रवृत्ति सट्टा खेळण्याकडे असते.

(१) बुध, मंगळ, शुक्र, चंद्र रवि, हे ग्रह सट्टा, शेअर, वायदे यांचे द्योतक आहेत.

(२) चंद्रबुध, चंद्रमंगळ, चंद्रशुक्र, चंद्ररवि, अगर, रविबुध, रविमंगळ, रविशुक्र, यांचे योग ज्यांचे कुंडलींत आहेत त्यांची सट्टयाकडे प्रवृत्ति असते.

(३) धनस्थानीं, पंचमस्थानीं, नवमस्थानीं, दशमस्थानीं, एकादश-स्थानीं, अगर चतुर्थस्थानीं, रवि, चंद्र, मंगळ, बुध, शुक्र, यांचे योग जर चांगले झाले असतील तर सट्टयाचे व्यवहारांत फायदा होतो.

(४) वरील स्थानीं, रवि, बुध, शुक्र, चंद्र, मंगळ, हे ग्रह जर शुभ-राशींत योग करतील तर, पापग्रहानें पीडित नसतील तर सट्टयांत फायदा होतो.

(५) पंचमेश रवि असून तेथेंच चंद्र असेल आणि त्यांच्यावरोवर राहु योग करीत असेल तर सट्टयांत मोठमोठाले लाभ होतात.

(६) पंचमांत तूळेचा शुक्र बुधासह असेल तर सट्टयांत फायदा होतो.

(७) पंचमांत वृश्चिकेचा मंगळ असेल आणि त्याचेवरोवर शुक्र असेल तर सट्टयांत फायदा होतो.

(८) पंचमांत कन्येचा बुध असून त्याचेवरोवर जर रवि असेल तर सट्टयांत फायदा होतो.

(९) वरील पंचमांतील ग्रहावरोवर राहू योग करीत असेल तरी सुद्धां मोठमोठाले लाभ सट्टयांत होतात.

(१०) जन्मकुंडलींत धनयोग अत्यंत वलवान् पाहिजे. लग्नेश आणि चंद्र शुभयोगांत पाहिजे, आणि वरील योग झाले म्हणजे सट्टयांत द्रव्य-प्राप्ति आहे असें समजावें.

---

१९. लाभदायक दशा.

नुसती कुंडली पाहून ही कुंडली चांगली आहे, ग्रह जोरदार आहेत, ग्रहांचे योग फार चांगले झालेले आहेत, उच्चग्रह बरेच आहेत, हें सांगून भागणार नाहीं. उलटपक्षीं यांचें फल काय असें विचारतां, धनधान्य, गाडीघोडा, नोकरचाकर, जडजवाहीरप्राप्ति, मिळून तुमची समाजांत कीर्ति होईल, असें जरी सांगितलें तरी केव्हां ? वयाचे कोणत्या वर्षी ? असे प्रश्न मनुष्य सहजच विचारतो. तेवढ्याकरितां कोणत्या ग्रहाची दशा चालू असतां काय काय फलें मिळतात हें इतरत्र दशा प्रकारणीं पहावें. या ठिकाणीं फक्त कोणत्या ग्रहांच्या महादशा व अंतर्दशा लाभदायक जातात त्याचा विचार करूं.

१) रविमहादशाः— वस्तुतः रविमहादशेचें फलित चांगलें मिळत नाहीं. परंतु रविमहादशा चालूं असतांना रविमहादशेंत चंद्राची, मंगळाची आणि गुरूची अंतर्दशा चांगली जाते. या तिन्ही ग्रहांच्या अंतर्दशेंत धनप्राप्ति, सुखाची वृद्धि, सोनें, मोतीं, जडजवाहीर, खरेदी केलें जातें. शत्रूंचा नाश आणि मित्रांची वृद्धि होते. कोणत्याही प्रकारें अडचण भासत नाहीं.

(२) चंद्रमहादशाः— चंद्रमहादशा चांगली जाते. आणि विशेषतः चंद्रमहादशेंत चंद्राची, गुरूची, बुधाची आणि शुक्राची अंतर्दशा विशेष प्रकारें लाभदायक जाऊन खालील फलें मिळतात.

सासऱ्याकडून धनप्राप्ति, कुलाची वृद्धि, सुखप्राप्ति, धर्मावर श्रद्धा, व्यापारांत फायदा, वस्त्र, अलंकार यांचें सुख, जेथें जाल तेथें फायदा, जनावरांचें सुख, तीर्थयात्रा, विलासी स्त्रियांपासून सुख इत्यादि गोष्टी प्राप्त होतात.

(३) मंगळमहादशाः— मंगळमहादशा चांगली जात नाहीं. परंतु

मंगळमहादशेंत चंद्राची व गुरूची अंतर्दशा चांगली फलदायी होते. त्यांत विशेष खालीलप्रमाणें फल मिळतें:—

तीर्थयात्रा, देवाब्राह्मणाविषयीं श्रद्धा, अनेक प्रकारें धनलाभ, मित्रापासून फायदा, राजदरबारीं मानसन्मान इत्यादि गोष्टी प्राप्त होतात.

(४) बुधमहादशाः— बुधमहादशा चालू असतां काळ चांगल्या प्रकारें जातो. त्यांतले त्यांत बुधमहादशेंत बुधाची, शुक्राची, रवीची आणि गुरूची अंतर्दशा चांगली जाते. त्याचीं फलें खालीलप्रमाणें:—

सुवर्ण, वस्त्र, विद्या, पैसा, शरीरसुख, स्त्रीसुख, अनेक प्रकारची द्रव्यप्राप्ति, मित्रांची मदत, व्यापारांत फायदा, अलंकारप्राप्ति, ऐश्वर्यवृद्धि, वाहनसुख, कार्यांत यश, आणि विशेष प्रकारचें तेज प्राप्त होतें.

(५) गुरुमहादशाः— गुरुमहादशा चांगली जाते व गुरुमहादशेंत, गुरूची, बुधाची, रवीची, आणि मंगळाची अंतर्दशा विशेष फलदायी जाते. त्याची प्राप्त होणारीं फलें येणेंप्रमाणें:—

धनधान्यप्राप्ति, पुत्रप्राप्ति, मित्रापासून फायदा, शत्रूवर जय, सुखप्राप्ति, व्यापारांत व उद्योग धंद्यांत फायदा, आचरण चांगलें रहातें, देवाधर्मावर श्रद्धा बसते, तीर्थयात्रा घडतात, शत्रूवर विजय मिळतो, कीर्ति वाढते, आरोग्य प्राप्त होतें, राजदरबारीं मानसन्मान मिळतो, आणि स्वतःचे शिरावर कोणतेंही जबाबदारीचें काम घेऊन तें पार पाडलें जातें.

(६) शुक्रमहादशाः— शुक्रमहादशा चांगली जाते. आणि शुक्रमहादशेंत शुक्राची, गुरूची आणि बुधाची अंतर्दशा चांगली जाते. त्यांत खालील फलें मिळतातः—

मनासारखी स्त्रीप्राप्ति, वैभव आणि ऐश्वर्य प्राप्त होतें, कीर्ति वाढते, धनधान्याला कमतरता पडत नाहीं, द्रव्यलाभ पुष्कळ होतात, व्यापार चांगला चालतो, यश मिळतें, मोठमोठाल्या माणसांची मैत्री होते.

(७) शनिमहादशाः— शनिमहादशा विशेष प्रकारें चांगली जात

नाहीं. फक्त शनिमहादशेंत बुधाची, शुक्राची आणि गुरूची या अंतर्दशा लाभदायक जातात. त्यांत पुढीलप्रमाणें फलप्राप्ति होते.

सौख्य, आरोग्य, यश, संतति, संतोष, व अनेक प्रकारचे द्रव्यलाभ, स्त्रीप्राप्ति, मोठया लोकांकडून फायदा, व धनाची वृद्धि होते. इच्छिलेले मनोरथ पूर्ण होतात.

(८) राहुमहादशाः— राहुमहादशा चांगली जात नाहीं. फक्त राहुमहादशेंत शुक्राची अंतर्दशा चांगली जाते. व त्यांत पुढील गोष्टी प्राप्त होतातः—

स्त्रीप्राप्ति, धनप्राप्ति, परस्त्रीशींसंबंध येतो.

(९) केतुमहादशाः— राहुमहादशेप्रमाणेंच केतुमहादशा वाईट फलें उत्पन्न करिते. केतुमहादशेंत फक्त गुरूची आणि बुधाची अंतर्दशा चांगली जाते आणि त्यांत पुढील गोष्टी प्राप्त होतातः—

पुत्रप्राप्ति, स्थावरप्राप्ति, राजदरबारीं मान, धनप्राप्ति, कोणत्याही प्रकारें क्लेश होत नाहींत, दुष्टांशीं मैत्री होते.

जन्मकुंडलींत अगर राशी कुंडलींत ग्रहांना ज्याप्रमाणें स्थानमहात्म्य असेल, ग्रह जर राशीबली असतील, तर त्याप्रमाणें ग्रहांचें शुभाशुभत्व पाहून कोणतीं फलें किती प्रमाणांत मिळतील तें ठरवावें. हीं वर दिलेलीं फलें अष्टोत्तरीं वा विंशोत्तरीं कोणत्याही दशा महादशेला उपयोगी पडतात. फक्त लाभदायक दशेचाच विचार केलेला आहे.

---

२०. मृत्युपत्रान्वयें किंवा वारस हक्कानें धनप्राप्ति.

ज्या वेळीं मृत्युपत्रान्वयें किंवा वारस हक्कानें धनप्राप्तीचा योग पाहणें असेल, तेव्हां प्रामुख्यानें अष्टमस्थानाचा विचार करावयास पाहिजे. अष्टमस्थान हें मृत्युस्थान आहे. तेव्हां मृत्युपत्रान्वयें मिळणारी इष्टेट याच ठिकाणीं पाहावी.

(१) अष्टमस्थानीं चंद्र, शुक्र, किंवा गुरु असेल तर विनाश्रमानें द्रव्यप्राप्ति होते.

(२) अष्टमस्थानांतील शुक्र, लांचलुचपतीनें द्रव्यप्राप्ति दर्शवितो.

(३) शनि, मंगळ, अष्टमांतील, गुरु, शुक्र, किंवा चंद्र यावरोबर जर शुभ राशींत युती अगर शुभयोग करीत असतील तर वारसानें इष्टेट मिळते.

(४) अष्टमस्थानीं गुरु शुक्र, स्वगृहीं उच्च राशींत असतील तर मृत्युपत्राअन्वयें इष्टेट मिळते. लॉटरींत नशीब उघडतें.

(५) अष्टमाचें अष्टमस्थान म्हणजे आपलें तृतीयस्थान या स्थानच्या अधिपतीशीं व अष्टमेशाशीं ज्या ग्रहांचा योग होतो व तो ग्रह ज्या स्थानचा मालक असेल त्या स्थानांत जो नातेवाईक असेल तो मृत्युपत्रान्वयें धन देण्यास कारणीभूत होतो. अकल्पित धनयोग पाहून सारासार विचार करून योग्य तो निर्णय करावा.

२१. सांपत्तिक अडचणी.

हरएक मनुष्याला सांपत्तिक अडचण केव्हां उत्पन्न होते, याचा विचार आपणांस करावयाचा आहे. पैशाच्या जोरावरच सर्व व्यवहार चालत असल्यानें तो पैसा आपल्याला केव्हां कमी पडणार आहे, याची जाणीव अगाऊ झाल्यास बरेच सावधगिरीनें रहातां येईल.

प्रत्येक मनुष्यानें आयुष्यांतील आपला सांपत्तिक हलाखीचा काळ अवश्य समजावून घेतला पाहिजे. हातावर पोट भरणाऱ्या, नानाप्रकारचे लहान मोठे धंदे करणाऱ्या माणसांनीं अथवा कनिष्ठ वा वरिष्ठ प्रतीच्या नौकरदारांनीं किंवा श्रीमंतसावकारांनीं आपल्या सांपत्तिक हलाखीचें यथार्थ ज्ञान करून घेतल्यास पुष्कळ मदत होऊन त्यांना सावधगिरीनें राहतां येईल व येणाऱ्या अडचणीला, अंशतः कां होईना, तोंड देण्याचें सामर्थ्य प्राप्त करून घेतां येईल.



वरील कुंडली पहा. ज्या ठिकाणीं १ लिहिला आहे तें स्थान पहिलें व जेथें २ लिहिला आहे तें स्थान दुसरें. त्याला धनस्थान असें म्हणतात. हें स्थान धनसंग्रहाचें म्हणून समजण्यांत येतें. आपल्याजवळ असलेला धनसंग्रह या स्थानावरून समजतो. तसेंच जेथें १२ हा आकडा लिहिला आहे तें बारावें स्थान म्हणजे व्ययस्थान. हें स्थान धननाशाचें आहे. या दोन स्थानांवरून मुख्यत्वेंकरून सांपत्तिक अडचणींचा विचार करावा.

ज्यावेळीं धनस्थानीं एकादा पापग्रह येतो त्या वेळीं धन कितीही मिळविलें तरी शिल्लक राहात नाहीं. कदाचित् पदरमोड करावी लागते. जवळ असलेल्या धनाचा सांठा संपल्यामुळें कर्ज काढण्याचा प्रसंग येतो. प्रसंगविशेषीं जवळ असलेले दागदागिने विकावे लागतात. अगर गहाण ठेवून पैसे आणावे लागतात. यावरून ज्या ज्या वेळीं आपणाला कर्ज काढण्याचा प्रसंग येतो, दागदागिने मोडावे लागतात अगर गहाण ठेवावे लागतात किंवा मिळविलेलें सर्व द्रव्य जसेंचें तसें सावकाराच्या हवालीं करावें लागतें, त्यावेळीं धनस्थानांतून पापग्रहाचें भ्रमण चालू आहे असें समजावें.

(१) धनस्थानांतील पापग्रहाचा मोठा गुण म्हणजे तो कधींही द्रव्यसंचय होऊं द्यावयाचा नाहीं.

(२) धनस्थानचा अधिपति पापग्रह असून तो जर त्या स्थानांत येईल तर धन पुष्कळ मिळेल, पण शिल्लक मात्र राहणार नाहीं.

(३) रवि, मंगळ, शनि, राहु हे पापग्रह आहेत.

(४) धनस्थानीं रवि, मकर, मेष, तूळ, कर्क, वृश्चिक या राशींत या स्थानीं चांगला नाहीं.

(५) धनस्थानीं मंगळ, कर्क, सिंह, धनु, मकर या राशींत या स्थानीं नुकसान फार करील.

(६) धनस्थानीं शनि, मेष, कर्क, सिंह, वृश्चिक, धनु या राशींत भयंकर नुकसान करील.

(७) धनस्थानीं राहु हा मिथुन राशीशिवाय इतर कोणत्याही राशींत धनसंग्रहाला अनिष्ट समजावा.

(८) जर धनस्थानीं, रवि, शनि अगर मंगळ युती करतील तर फार मोठी ठोकर बसते, नुकसान होते, पेढ्या बुडतात, आणि भयंकर असा सांपत्तिक हलाखीचा काळ उत्पन्न होतो.

(९) व्ययस्थानीं म्हणजे बारावे स्थानीं पापग्रह आला म्हणजे निष्कारण धन खर्च होतें.

(१०) ज्यावेळीं बारावें स्थानांतून म्हणजे व्ययांतून पापग्रहाचें भ्रमण चालतें त्या वेळीं चोरी होते. दागदागिने अगर पैसे हरवतात. एखाद्या इष्टेटीचा दावा चालला असेल आणि ती वेळ जर निकालाची असेल तर निकाल उलटा होतो. लबाड लोक फसवतात. खरेदी केलेला माल कवडी किंमतीनें विकला जातो. आणि लाचारीनें कितीही हिंडलें तरी कर्ज मिळण्याची मारमार पडते. प्रखर दारिद्र्य अवस्था प्राप्त होते.

(११) धनुस्थानापेक्षां हें व्ययस्थान फार महत्वाचें आहे. कारण यांत पापग्रह आल्यास तें नुकसान केल्याशिवाय जातच नाहींत.

(१२) बारावे स्थानीं शनि, मंगळ, आल्यास फार वाईट फल अनुभवाला येतें. द्रव्यचिंता फार वाटते.

(१३) धनस्थानीं पापग्रह व व्ययस्थानीं पापग्रह हा योग जर जन्मकाळीं असेल तर तो काल फारच वाईट होय.

(१४) धनस्थानीं अगर व्ययस्थानीं पापग्रह असून जर त्या पापग्रहांचा शत्रु त्याच्या जवळून अगर समोरून जाईल तर तोटा होतो.

(१५) धनस्थानीं अगर व्ययस्थानीं कोणताही ग्रह नसतां त्यांचे अधिपति ६।८।१२ या स्थानीं दुर्बल होतील तेव्हां अगर पापग्रहानें युक्त अथवा दृष्ट होतील तेव्हां सुद्धां संपत्तीची अडचण उत्पन्न होते.

(१६) ज्या ठिकाणीं जन्म कुंडलींत धनस्थानचा अधिपति असतो त्या अधिपतीच्या धनस्थानीं अगर व्ययस्थानीं पापग्रह आले असतां तो काळ सांपत्तिक अडचणीचा जातो.

(१७) चंद्राच्या धनांत अगर व्ययांत पापग्रह आले असतां नफ्यापेक्षां नुकसानच फार होतें.

(१८) रवीच्या चतुर्थांत शनि आला असतां अनेक प्रकारच्या आपत्ति भोगाव्या लागतात.

(१९) रवीच्या दशमांत शनि अगर हर्षल असणें अगर येणें फार वाईट. धंद्यामध्यें अनेक अडचणी व संकटें येतात. राजभय उत्पन्न होतें.

(२०) रवीच्या धनस्थानीं अगर व्ययस्थानीं शनि अत्यंत अशुभ फल उत्पन्न करितो. द्रव्य मिळविण्याच्या बाबतींत अनेक अडचणी निर्माण होतात. वरील योग जर जन्म कुंडलींत झाला असेल तर बापाचें कर्ज फेडावें लागतें.

(२१) रवि अष्टमांत असून मंगळाबरोबर जर अशुभ दृष्टियोग करीत असेल तर तो काळ वाईट आहे असें समजावें. किंवा अष्टमांत रवि असून मंगळ त्यांच्यावरोबर अशुभ दृष्टियोग करील तर संकटग्रस्त परिस्थिति निर्माण होते.

(२२) ज्यावेळीं द्वादश स्थानांतील कोणत्याही स्थानाशीं अगर स्थानाधिपतीशीं राहू, मंगळ, शनि, हर्षल हे केंद्र अगर षडाष्टक योग करीत असतील, किंवा करतील तर त्या स्थानाची अगर स्थानाधिपतीची फलें अनिष्ट मिळतील.

(२३) रवि निर्बल झाला असतां खडतर संकटें प्राप्त होतात.

(२४) लग्नाधिपति, दशमाधिपति, भाग्याधिपति, आणि रवि, चंद्र, हे ज्या ज्या वेळीं शनि, मंगळ, हर्षल या पापग्रहांच्या कर्तरींत येतील अगर केंद्र, षडाष्टक योग करतील त्या त्या वेळीं तो काळ मनुष्याच्या आयुष्यांत त्रासदायक व संपत्ति–हानिकारक जातो.

(२५) सहा, आठ, बाराव्या स्थानचे अधिपति, लग्नेश, धनेश, नवमेश, दशमेश, अगर रवि चंद्रावरोबर योग करतील तर माणसाला संकटें भोगावीं लागून द्रव्यचिंता निर्माण होते व अनाठायीं खर्चाचा व्यय होतो.

(२६) जन्मलग्नास अशुभ सांगितलेले ग्रह कोणतेही स्थानांत येतील त्यावेळीं त्या स्थानासंबंधीं क्लेश, अडचणी, पीडा, आहे असें समजावें.

(२७) सप्तमस्थानीं राहू असून त्याजवर ज़र शनि, मंगळाची पूर्ण दृष्टि असेल तर स्त्रीला त्या ग्रहाच्या दशाकालीं मोठमोठालीं दुखणीं येतात व त्यामुळें सांपत्तिक अडचण उत्पन्न होते. वायकोच्या कुंडलींत वरील योग असल्यास नवऱ्याला दुखणीं येतात.

(२८) कोणत्याही ग्रहाचेपुढें शनि व राहु आणि मागें रवि, मंगळ, हे ग्रह असल्यास मध्यें असणारा ग्रह फारच अनिष्टफल देतो.

(२९) सर्व प्रकारें हीन बली असणारा रवि दारिद्र्य योग उत्पन्न करितो व उत्तरार्धांत उघळ्या बनवितो.

(३०) अशुभ चंद्र, शनि, राहु हे अशुभ असून त्यानीं युक्त किंवा दृष्ट असेल अगर अशुभ संबोधित असेल तर सांपत्तिक हानि करून दारिद्र्ययोग उत्पन्न करितो.

(३१) अशुभ मंगळ नेहमीं धनहानि करितो.

(३२) अशुभ शुक्र संपत्तीचा नाश केव्हां व कशा प्रकारें करील याचा नेम सांगवत नाहीं.

(३३) अशुभ शनि मनुष्याला कोणत्या वेळीं काय संकट निर्माण करील, कोणचे पेचप्रसंग उत्पन्न करील व धनहानि कशी करील याचा नेम नाहीं.

(३४) कोणताही ग्रह अशुभस्थानीं पापराशींत पापग्रहानें दृष्ट किंवा पापसंबोधित असतां धननाश करतो. सांपत्तिकदृष्ट्या काळ हलाखीचा जातो.

(३५) धनस्थानीं असणाऱ्या ग्रहावर जर त्याच्या शत्रुग्रहाची दृष्टि असेल तर संपत्तिनाश होतो.

(३६) ज्यावेळीं, द्वितीय, द्वादश, पंचम, भाग्य, एकादश, अष्टम व षष्ट या स्थानाशीं किंवा या स्थानांच्या अधिपतीशीं राहू, मंगळ, शनि, हर्षल हे अशुभ योग करितील, तेव्हां मनुष्याच्या आयुष्यांत संकटग्रस्त परिस्थिति निर्माण होते, कर्ज काढावें लागतें, धंद्यांत नुकसान येतें, नौकरींत बिकट परिस्थिति निर्माण होते, अविचाराच्या गोष्टी हातून घडतात, बेअब्रू होते, अपमानकारक काळ कंठावा लागतो, कांहीं केलें तरी अपयशच पदरीं येतें व संपत्तीचा नाश होतो.

(३७) लग्नाधिपती अगर चंद्र ज्यावेळीं निर्बली, वक्री, पापकर्तरींत पापग्रहानें दृष्ट पापनवमांशीं पापग्रहानें पिडीत होतो, त्यावेळीं मनुष्याचें चित्तस्वास्थ्य ठिकाणावर राहत नाहीं. मनाला जबरदस्त धक्के बसतात व कारण नसतांना संपत्तीचा नाश होतो.

याप्रमाणें ग्रहांचीं फलें विचारपूर्वक ठरवावीं. उलटपक्षीं वरील स्थानीं जर बलवत्तर शुभग्रह येईल किंवा जन्मकुंडलींत अगर राशीकुंडलींत ४–९–११ या स्थानीं शुभग्रह अगर पापग्रह बलवान् असतील तर फारसा नाश होणार नाहीं. आलेलीं संकटें नाहींशीं होतील. यावरून कोणते ग्रह अनिष्ट आले म्हणजे किती सांपत्तिक अडचण येते, बेअब्रूचे प्रसंग कसे येतात, नादारी केव्हां ध्यावी लागेल, चोरी केव्हां होते, वस्तु केव्हां हरवतात, नुकसानीचे म्हणून जे जे प्रसंग येतात, वगैरे प्रश्नांचीं उत्तरें तुम्हांला बिनचूक काढतां येतील.

अनिष्ट परिस्थिति चालू असतां जर गुरु, बुध, शुक्र हे बलवान् असतील किंवा वरील ग्रहांपैकीं कुंडलीचा सत्ताधीश ग्रह जर पूर्ण बलवान् असेल तर संकटग्रस्त परिस्थितींतून मार्ग निघतो व सुखाचा काळ उत्पन्न होतो.

२२. यशापयश

मनुष्य ज्यावेळीं उद्योग करीत असतो, त्यावेळीं उद्योग करूनही केव्हां केव्हां कार्यसिद्धि होत नाहीं. अशावेळीं मनुष्याला आपल्या दैवाचें स्मरण होतें. बारा महिने शाळेंत पहिला नंबर असलेला विद्यार्थी परीक्षेंत नापास व्हावा, सुंदर चालणाऱ्या दुकानाचें दिवाळें निघावें, निराश्रित आणि दरिद्री माणूस श्रीमंत झालेला दृष्टीला पडावा, किंवा एकाद्या खटल्याच्या पुराव्यावरून अमुक पक्ष विजयी झाला पाहिजे असें वाटत असतें, परंतु ईश्वरी नेमानेमानें केलेला कयास सपशेल चुकतो; यावरून मनुष्य उद्योग करीत असतांना त्याला त्याच्या दैवाची अनुकूलता असल्याशिवाय अंगिकारलेल्या कार्यांत यशप्राप्ति होत नाहीं; कार्यकारणाचा संबंध जोंपर्यंत मनुष्यास जुळवितां येतो, तोंपर्यंत मनुष्यप्राणी उद्योगाची स्तुतीच करीत असतो. परंतु व्यवहारांत पुष्कळ वेळां असे शेंकडों प्रसंग येतात कीं, अशा वेळीं कार्यकारणभाव जुळवितांच येत नाहीं. तेव्हां मनुष्य आपल्या कपाळाला हात लावून स्वस्थ बसतो.

हरएक मनुष्याला कोणता ना कोणता उद्योग हा करावाच लागत असल्यानें बालापासून वृद्धापर्यंत, मग ती स्त्री असो नाहींतर पुरुष असो त्याच्या कार्यांत त्याला यश मिळण्याकरितां ज्योतिषशास्त्रदृष्ट्या कोणती ग्रहपरिस्थिति असली म्हणजे तो यशस्वी होईल व कोणती ग्रहपरिस्थिति असली म्हणजे तो अपयशी ठरेल या गोष्टींचा सांगोपाग विचार पुढील गोष्टीवरून ध्यानीं येईल व त्याप्रमाणें आपली उद्योगाची—यशप्राप्तीची वेळ ठरवितां येईल.

यशप्राप्तीकरितां खालील गोष्टींचा विचार करावा :--

(१) लग्न, नवम, पंचम हीं त्रिकोणस्थानें यशदायक आहेत.

(२) ज्या वेळीं नवमस्थानीं शुभग्रह येईल त्या वेळीं तो काल निश्चयात्मक यश देणारा आहे असें समजावें.

(३) ज्या वेळीं नवमांत गुरु भ्रमण करितो त्या वेळीं त्या वर्षांत हरएक कार्यांत यश मिळतें.

(४) जन्मकाळीं जर नवमांत गुरु असेल तर त्या माणसाचे सर्व उद्योग यशस्वी होतात. तो ज्या ज्या म्हणून संस्था उभारतो, त्या त्या निरंतर चालतात. त्याचा हेतु शेवटास जातो.

(५) गुरुचंद्राची युति अगर त्रिकोण, कार्यांत उत्तम प्रकारें यश देतो.

(६) लग्नाच्या, त्याचप्रमाणें चंद्राच्या त्रिकोणस्थानीं शुभग्रह असतां मनुष्य यशस्वी होतो.

(७) लग्नाच्या किंवा चंद्राच्या त्रिकोणस्थानीं असलेले ग्रह, उच्च, स्वगृहीं, मूलत्रिकोणीं असतील, तर उत्तमप्रकारें यश मिळतें.

(८) लग्नाच्या अगर चंद्राच्या त्रिकोणीं एकादा ग्रह मित्रक्षेत्रीं असेल तर मध्यम यश मिळतें व नीचशत्रुगृहीं असतां, कनिष्ट प्रकारचे यश मिळतें.

(९) ज्यावेळीं कंपनी स्थापावयाची असेल त्यावेळीं त्यांत माणसें यशदायक घ्यावींत. निदान कंपनीचा म्यानेजर तरी यशदायक असावा. आपले नोकरचाकर, वायको वगैरे गोष्टींत ते यशवान आहेत कीं नाहीं तें अवश्य पाहावें.

(१०) कुंडलींतील ६ वें व १२ वें हीं स्थानें अपयशाचीं आहेत, त्यांतले त्यांत ६ वें विशेष महत्त्वाचें आहे.

(११) सहाव्या स्थानांत शुभग्रह असतां कामा नये. असल्यास अपयश येतें.

(१२) सहाव्या स्थानीं चंद्र असतां कामाच नये. चंद्र, गुरु, शुक्र, बुध हे सहाव्या स्थानांत असल्यास अगर आल्यास यश मिळण्याची

आशाच नको. अपयश निश्चित समजावें. जन्मकाळीं जर सहाव्या स्थानीं वरील ग्रह असतील तर तो मनुष्य नित्य अपयशी समजावा.

(१३) ज्याप्रमाणें लग्नाच्या त्याप्रमाणें चंद्राच्या ६ व्या अगर १२ व्या स्थानीं शुभग्रह नसावा. १२ व्या स्थानीं शुभग्रह पतकरेल परंतु पापग्रह पतकरणार नाहीं..

(१४) ६व्या स्थानीं असलेले शुभग्रह नीच अगर शत्रुक्षेत्रीं असल्यास ते फारच वाईट फलें देतात. मित्रगृहीं मध्यम व स्वगृहीं मूलत्रिकोणीं किंवा उच्चग्रह फार कमी वाईट आहे असें समजावें.

(१५) एकही अपयशाचा योग नसतां व यशदायक योग असेल तर तो मनुष्य मोठा भाग्यवान् समजावा. याच्या उलट एकही यशदायक योग नसेल व अपयशाचा योग झाला असेल तर त्याच्यासारखा दुर्दैवी माणूस तोच असें समजावें.

(१६) यशाचे योग निश्चयात्मक फल देणारे आहेत, असें समजण्यास कोणतीच हरकत नाहीं.

(१७) केंद्रांतील ग्रहही यश देतात, परंतु एखाद्या महत्त्वाच्या कार्यांत ज्या वेळीं यश मिळतें त्यावेळीं त्या ग्रहाचा परिणाम घडलेला दिसणार नाहीं.

(१८) यशापयश पाहतांना धनस्थानाधिपति व लाभस्थानाधिपति यांचा विचार करणें जरूर आहे. ज्या वेळीं धनस्थानाधिपति व लाभस्थानाधिपति यांचें पाठबळ असेल, तर इष्टकार्य साध्य झालेंच पाहिजे आणि जन्मकाळीं जन्मकुंडलींत धनस्थानाधिपति व लाभस्थानाधिपति जोरदार असल्यास आणि तसें गोचरींचें आल्यास हटकून इष्टकार्य सिद्धि मिळते.

कोणत्याही कार्याला आरंभ करितांना यशदायक वेळ पाहावी, हें जरी खरें असलें तरी कार्यकर्त्याच्या जन्मकुंडलींत अगर राशीकुंडलींत यश देणारे ग्रह असले पाहिजेत. नुसती वेळ उत्तम असून भागणार नाहीं.

प्रथम कार्यकर्त्याची जन्मकुंडली पाहावी. नंतर शुभदायक वेळ पाहावी, कार्यकर्त्याची कुंडली नसल्यास निदान वेळ तरी अवश्य पाहावी.

कार्यकर्त्याची पात्रता पाहून नंतर यशदायक ग्रहपरिस्थिति पहावी. म्हणजे कार्यसिद्धि होऊन यश मिळेल.

---

२३. धनसहम

जन्मकुंडलींत आपण संपत्तीचा विचार करितांना जसा गुरु, शुक्र, अगर संपत्तिदायक स्थानांचा विचार करितों, त्याचप्रमाणें, पाश्चिमात्य ज्योतिषी संपत्तीचा विचार करितांना जन्मकुंडलींत "पार्ट ऑफ फॉर्च्यून" म्हणजे "धनसहम" कोठें आहे, त्यावर शुभग्रहाची दृष्टि आहे कीं नाहीं, हें पाहून कुंडलीचा सांपत्तिक दर्जा ठरवितात. तेव्हां धनसहम तयार करण्याची रीत पुढील प्रमाणेः-जन्मलग्न + जन्मचंद्र- जन्मरवि = धनसहम. पुढें दिलेल्या जन्मकुंडलींत धनसहम कोठें आहे, तें उदाहरणार्थ पाहूंः-खालील कुंडलीचेंः—



	रा.	अं.	क.	वि०
जन्मलग्न	११	२३	४९	२५
जन्मचंद्र +	९	२२	१०	१०
	९	१५	५९	३५
जन्मरविः-	३	२०	४०	४
धनसहम अथवा लक्ष्मीचिन्हः-	५	२५	१९	३१

म्हणजे जन्मकुंडलीच्या सप्तमस्थानीं धनसहम आले, यावरून संपत्तीचा विचार करितांना असें आढळून येतें कीं—सप्तमस्थान हें व्यापाराचें

ठिकाण आहे. त्याच ठिकाणीं शुक्र आहे. आणि तेथेंच धनसहम आलें, तें रवीच्या लाभयोगांत व चंद्राच्या नवपंचम योगांत. आणि गुरु, बुधाच्या शुभ योगांत असल्यानें सदर जन्मकुंडलीच्या मालकाचा सांपत्तिक दर्जा फार मोठा आहे, आणि त्यांनीं स्वतःच्या कर्तबगारीवर व्यापारांत कोट्यावधि रुपये मिळविले आहेत.

(१). धनसहम ६ वें, ८ वें, १२ वें स्थानीं नसावें. तसेंच तें शुभसंबोधित असावें.

(२) केंद्रांत अथवा ५ वें व ९ वें ठिकाणीं धनसहम असावें. तें विशेष फलदायी होतें.

(३) २ रें व ११ वें ठिकाणीं धनसहम शुभ योगांत असल्यास पैशाची चिंता पडत नाहीं.

(४) धनसहमावरून ज्यावेळीं गोचरीच्या योगानें शुभग्रहाचें भ्रमण होतें त्यावेळीं सांपत्तिकदृष्ट्या काळ चांगला जातो.

(५) पापग्रहाचें भ्रमण ज्यावेळीं होईल तो काळ सांपत्तिकदृष्ट्या अडचणीचा जाईल.

ज्या ज्या स्थानीं धनसहम येईल, त्या स्थानांत ज्या ज्या गोष्टी पाहावयास सांगितल्या असतील, त्या बद्दल जर तें धनसहम शुभयोगांत असेल तर फलाची वृद्धि होते. अशुभ योगांत असेल तर फलाची हानि होते.

---

२४. ग्रहांचे सांपत्तिक योग

(१) युतीः—ज्यावेळीं एकाच स्थानांत शून्य अंशांत दोन ग्रह असतील, त्यावेळीं त्याला युती म्हणतात.

(२) द्विर्द्वादशः—ज्यावेळीं दोन ग्रहांमध्यें ३० अंश अंतर असतें तेव्हां त्या योगाला द्विर्द्वादशयोग म्हणतात.

(३) त्रिर्एकादशः—ज्यावेळीं दोन ग्रहांमध्यें ६० अंश अंतर असतें, त्यावेळीं त्याला लाभयोग किंवा त्रिर्एकादशयोग म्हणतात.

(४) केंद्रः—ज्यावेळीं दोन ग्रहांमध्यें ९० अंश अंतर असतें, त्यावेळीं त्याला केंद्रयोग म्हणतात.

(५) नवपंचमयोगः—ज्यावेळीं दोन ग्रहांमध्यें १२० अंश अंतर असतें, त्यावेळीं त्याला नवपंचमयोग म्हणतात.

(६) षडाष्टकः—ज्यावेळीं दोन ग्रहामध्यें १५० अंश अंतर असतें, तेव्हां त्यावेळीं त्याला षडाष्टकयोग म्हणतात.

(७) प्रतियुतीः—ज्यावेळीं दोन ग्रहांमध्यें १८० अंश अंतर असतें, त्यावेळीं त्याला प्रतियुती म्हणतांत. त्यावेळीं ग्रह समोरासमोर येतात.

(८) द्विर्द्वादश, त्रिर्एकादश, नवपंचम हे शुभयोग आहेत.

(९) युती, केंद्र, षडाष्टक आणि प्रतियुती हे योग अशुभ आहेत.

(१०) दोन शुभग्रहामधील शुभ योग अत्यंत शुभ फल देतो.

(११) एक शुभग्रह आणि एक पापग्रह यांमधील शुभयोग मध्यम शुभफल देतो.

(१२) दोन पापग्रहांमधील अशुभ योग वाईट फळें निर्माण करितात व शुभयोग कांहींशीं शुभफलें निर्माण करितात.

पाश्चिमात्य पद्धतीप्रमाणें आणखी कांहीं योग पाहतात, ते खालील प्रमाणेः—

(१३) दोन ग्रहांमध्यें ४५ अंश अंतर पडलें कीं अर्ध काटकोन दृष्टियोग होतो. हा योग अशुभ मानला आहे.

(१४) जेव्हां दोन ग्रहांमध्यें ७२ अंश अंतर पडतें, तेव्हां जो दृष्टियोग होतो, तो थोडासा शुभ मानतात.

(१५) जेव्हां दोन ग्रहांमध्यें १३५ अंश अंतर पडतें, तेव्हां जो दृष्टियोग होतो तो अशुभ मानला आहे.

(१६) जेव्हां दोन ग्रहांमध्यें १४४ अंश अंतर पडतें, तेव्हां जो दृष्टियोग होतो, तो कांहीं अंशीं शुभ मानला आहे.

(१७) कोणताही ग्रह कोणत्याही ग्रहाशीं दृष्टियोग करण्यास जाण्या पूर्वी ६ अंश व दृष्टियोग झाल्यानंतर ८ अंश त्या त्या दृष्टियोगाचवरा अगर वाईट परिणाम करितात.

येणेंप्रमाणें विचारपूर्वक दृष्टियोगाचा विचार करून त्याप्रमाणें फलें निश्चित करावीं.

---

२५. आर्थिक पत

पुष्कळ वेळां असें होतें कीं आपल्याजवळ पैसा नसतो. तेव्हां आपल्या मित्रांकडून अगर सावकारांकडून आपल्या पतीवर आपण कर्ज काढतों; अशा वेळीं आपण मागितल्याबरोबर आपणांस पैसे नुसत्या आपल्या शब्दावर मिळतील किंवा नाहीं, अगर त्या करितां कांहीं प्रोनोट अथवा कर्जरोखा लिहून द्यावा लागेल, आपण कर्जरोखा अगर प्रोनोट लिहून देण्यास तयार असतांनासुद्धां कांहीं वेळां पैसे मिळत नाहींत, तेथें जामीन द्यावा लागतो. उदा०—व्यांका, सोसायट्या

यांमधून कर्ज काढतांना जामीन द्यावा लागतो. परंतु वर सांगितलेल्या प्रकाराहूनही कोणताच प्रकार आपणांस करितां येत नाहीं. किंवा कोणत्याच प्रकारानें कर्ज मिळत नाहीं, त्या वेळीं पुढील तारखेचा चेक देऊन आपण मारवाड्याकडून अगर अन्य माणसांकडून, कर्ज काढण्याचा प्रयत्न करितों. तोही न साधल्यास कांहीं जिन्नस गहाण ठेवून कर्ज काढावें लागतें. तेव्हां वरील निरनिराळ्या प्रकारांनीं ज्या ज्या वेळीं कर्ज काढण्याचा प्रसंग येतो, त्या त्या वेळीं आपली जन्मकुंडलींतील ग्रह-परिस्थिति कशी असते, याचा विचार करूं.

व्यापारीबाजारांत शब्दावर मोठमोठाले सवदे होतात. शेअर बाजारांत पतीवर, शब्दावर हजारों रुपयांचे सवदे, सट्टे, व्यापार होतात. तेव्हां अशी परिस्थिति कोणता ग्रह निर्माण करितो, तें पाहूं:—

जन्मकुंडलींतील दुसरें स्थान वाचास्थान! तेव्हां त्या स्थानाचा विचार करावयास पाहिजे.

(१) दुसऱ्या स्थानचा मालक शुभग्रह असून तो शुभस्थानीं, शुभग्रहानेंदृष्ट, शुभयोगांत असेल तर त्याच्या शब्दाला किंमत असते.

(२) षष्ठांत, अष्टमांत, दशमांत गुरु असलेल्या माणसाच्या शब्दावर लोक विश्वास ठेवितात.

(३) दुसऱ्या स्थानीं धनुराशी असेल तर त्या माणसावर विश्वासलें असतां नुकसान होतें.

(४) लग्न, रवि, चंद्र व बुध यांची स्थिति जरूर लक्षांत घ्यावी. जर वरील ग्रह मेष, सिंह, धनु या राशींत शुभ स्थानीं असतील तर त्यांच्यावर लोकांचा विश्वास बसतो.

(५) बुध, मंगळाची युती जर जन्मकुंडलींत असेल तर अशा माणसावर विश्वास ठेवूं नये. हीं माणसें फार बुद्धिमान असतात. परंतु

या माणसांची बुद्धि कधीं चांगल्या तर कधीं वाईट कामाकडे वळेल, तें निश्चित सांगणें फारच कठीण जाईल.

(६) रवि, चंद्रावर शुक्राची दृष्टि असलेलीं माणसें, उघळीं असल्यानें त्यांच्यावर विश्वास ठेवणें धोक्याचें असतें.

(७) जन्मकुंडलींत जर शनि, बुध युती असेल तर अशा माणसावर विश्वास किती ठेवावयाचा याचा विचारच करावयास पाहिजे. कारण अशीं माणसें हलकट निघतात.

(८) दुसऱ्या स्थानीं पापग्रह, पापराशी, किंवा दुसऱ्या स्थानांत पापग्रहांची दृष्टि असेल तर त्यांच्या शब्दावर भरंवसा किती ठेवावयाचा याचा सारासार विचार करून उत्तर ठरवावें.

येणेंप्रमाणें आर्थिक पतीचा विचार करून उत्तरें द्यावीं.

---

२६. कुंडली संग्रह

सुमारें शंभर कुंडल्यांचा संग्रह सोबत दिलेला आहे. ज्या कुंडल्या दिलेल्या आहेत, त्या सर्वांच्या बहुतेक परिचीत अशाच देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

कोणताही योग पाहात असतां जर प्रत्यक्ष कुंडली त्या योगाची डोळ्यासमोर असेल, तर त्या योगाचें महत्व चटकन् लक्षांत येतें. पुष्कळ वेळां. निरियन कुंडल्या अंशात्मक मांडलेल्या नसल्यानें, डोळ्याला योग दिसत असून सुद्धां वस्तुतः ते योग झालेले नसतात, अगर होऊन गेलेले असतात त्यामुळें नुसत्या भ्रामक कल्पनेनें जर एखाद्या विशिष्ट योगाचें फलित सांगितलें गेलें, तर तें बरोबर येत नाहीं, व त्यामुळें ज्योतिषालाच त्या योगाचा भ्रम उत्पन्न होतो तेव्हां पुढील कुंडलींत योग पाहात असतांना

जर ते अंशात्मक पाहिले गेले तर तुम्हांला पुष्कळच उत्तम तऱ्हेचे योग दृग्गोचर होतील.

कुंडलींतील चार केंद्रें व पांच आणि नऊ स्थानें हीं अत्यंत महत्त्वाचीं असल्यानें, प्रत्येक केंद्रापासून पांचवें व नववें स्थान महत्त्वाचें आहे व त्यांना निरनिराळीं नांवें आहेत ज्योतिषशास्त्रांत त्याला त्रिकोण म्हणतात. चार केंद्रें असल्यानें कुंडलींत चार त्रिकोण होतात. पहिला त्रिकोण--पहिलें स्थान, पांचवें स्थान व नववें स्थान हा होय. याला पुरुष त्रिकोण म्हणतात. हा अत्यंत महत्त्वाचा त्रिकोण आहे.

दुसरा त्रिकोण–सप्तमस्थान, एकादशस्थान व तृतीयस्थान यांत होत असून याला प्रकृती त्रिकोण असें म्हणतात. तिसरा त्रिकोण–दशमस्थान, द्वितीयस्थान, व षष्ठस्थान यांत होत असून याला ऐश्वर्य त्रिकोण असें म्हणतात. चवथा त्रिकोण–चतुःर्थस्थान, अष्टमस्थान व व्ययस्थान या स्थानांत होत असून या त्रिकोणाला वैराग्य त्रिकोण असें म्हणतात. या चारी त्रिकोणांचा उपयोग कुंडलीचा दर्जा ठरविण्याकरितां तुम्हांला करतां येईल.

केंद्रत्रिकोणाचे अधिपतीवर विशेष भर द्या. आणि कुंडलीचा सत्ताधिश ग्रह पहा, कुंडलीला अनुकूल, प्रतिकूल ग्रह कोणते आहेत त्याचा विचार करा त्यानंतर, ग्रह उच्च, नीच, अस्तंगत, स्वक्षेत्रीं, मूलत्रिकोणीं, मित्र-क्षेत्रीं, शुभग्रहानें दृष्ट, शुभसंबोधित, शुभयोगांत, अगर निर्बली, हिनबली, पापक्षेत्रीं, पापग्रहसंबोधित, पापग्रहदृष्ट, शत्रुक्षेत्रीं, शुभ अगर पापस्थानीं आहे किंवा काय वगैरे गोष्टींचा सारासार विचार करून जर तुम्ही कुंडल्या पाहूं लागलात तर तुम्हाला कुंडल्याचें महत्त्व लक्षांत येईल, व कोणतीही कुंडली सुलभ तऱ्हेनें सोडवितां येईल.

कुंडलीला, संपत्ति, सामाजिकदर्जा, अधिकार व ऐश्वर्य कोणत्या कारणांमुळें मिळालें, कोणत्या कुंडलीला कोणता ग्रह विशेष फल देतो तें निरीक्षण करून पहा व आपली खात्री पटवा.

आभार

पुस्तकाच्या प्रारंभींच नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें आभार मानण्याचें धोरण मीं बदलून माझ्या मागील " महाराष्ट्राची व्यापाराकडे धांव " या पुस्तकांत शेवटीं आभार मानले आहेत तद्वत् याही पुस्तकांत तेंच अनुकरण पुढें चालूं ठेवितों.

ज्यांनीं मला व्यापारीवर्गांत शिरकाव करून दिला, ज्यांच्या साह्यानें व प्रोत्साहनानें मी पुस्तक लिहून प्रसिद्ध करूं शकतों, ते माझे मुंबईचे परमप्रिय मित्र श्री. रा. रा. दिगंबर परशुराम उर्फ़ भय्यासाहेब गोडबोले, सुपरिंटेंडेंट मेसर्स दादाजी धाकजी ॲण्ड कंपनी लि० मुंबई यांचे प्रथम आभार मानले पाहिजेत.

याशिवाय हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें कामीं माझे मित्र श्रीमंत रा. रा. वासुदेव लक्ष्मण उर्फ़ काकासाहेब लिमये व श्रीमंत रा. रा. शेट काशिनाथ गणपत उर्फ़ बाबूराव पानवकर यांचे आभार मानले पाहिजेत.

त्याचप्रमाणें या पुस्तकाची प्रुफें तपासण्याचें कामीं माझे मित्र श्री. रा. रा. यशवंत विठ्ठल उर्फ़ भाऊसाहेब आपटे यांनीं जी आपलेपणानें मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानल्याशिवाय राहवत नाहीं.

शेवटीं हें अंगिकारलेलें कार्य ज्यांच्या कृपेमुळें निर्विघ्नपणें पार पडलें त्यांचे आभार मानून माझ्या कुलस्वामिनीच्या व आराध्यदेवतेच्या चरणीं मस्तक ठेवून, त्यांना अनन्यभावानें शरण जाऊन, त्यांनीं माझे हातून जी ही अल्पस्वल्प कृति निर्माण केली ती लोकादराला पात्र होऊन सर्वत्रांना मार्गदर्शक व्हावी, एवढी प्रार्थना करून मी आपली तूर्त रजा घेतों.

॥ ॐनमः शिवाय ॥

— ॐ नमः शिवाय —

भालचंद्र ज्योतिर्विद्यालय, ६०९ सदाशिव पेठ पुणें.

स्थापना १९३७

समाजांत श्रेष्ठपणा, ऐश्वर्य, विविध प्रकारची अर्थप्राप्ति, सुकीर्ति, वादविवादांत यश, लोकांना वश करून घेण्याची कला, दीर्घायुष्य, स्त्रियांचा भोग; पुत्रादि प्राप्ति, सकलार्थसिद्धी, धनकनकसंपन्नता, ईशभक्ति, गुरुभक्ति, ज्ञानप्राप्ति, वैभव, वाग्पांडित्य, धनधान्यसमृद्धि, दातृत्व, सामर्थ्य, मनोरथ, मानसन्मान, पौरुषत्व, नांवलौकिक, सकल रोगांचा नाश, विद्याप्राप्ति, कलानैपुण्य, पुण्यक्षेत्रदर्शन, सट्टा, रेस, लॉटरी, भूमिगतद्रव्य, स्त्रियांकडून धनप्राप्ति वगैरे गोष्टीकरितां विद्यालयाच्या भविष्यकथन विभागाला भेट द्या. आणि आपल्या मनाला लागलेली चिंता, क्लेश, काळजी, मानसिक व्यथा, दूर करा.

विद्यालयाच्या दैवी विभागांत अनिष्ट ग्रह निवारणार्थ दैवी उपाय सांगितले व केले जातात.

भालचंद्र ज्योतिर्विद्यालय

६०९ सदाशिव पेठ, पुणें.

महात्मा गांधी
ता० २ आक्टोबर १८६९
सकाळी ७ वा. ३६ मिनिटें.

नं.१



मुख्य प्रधान चर्चिल
ता० २९ नोव्हेंबर १८७४
इंग्लंड

नं.२



सिनॉर मुसोलिनी
ता० २९ जुलै १८८३.
दुपारीं २ वाजतां
(डोव्हिआ, इटली)

नं.३



जोसेफ स्टॅलिन
ता. १ जानेवारी १८८०
पहाटे ३ वाजून ५ मिनिटें
रशिया

नं.४



हर हिटलर
ता० २० एप्रिल १८८९
सायंकाळी ६ वाजून ३० मिनिटें
जर्मनी



बादशहा सहावे जॉर्ज
जन्म ता. १४ डिसेंबर. १८९५
पहाटे ३ वाजून ५ मिनिटें
इंग्लंड

जपानचे बादशहा हिरोहिटो
जन्म ता० २९ एप्रिल १९०१



चँग-के-शेक चीन
जन्म ता० ३० ऑक्टोबर १८८५



नं.९

श्रीमंत नानासाहेब महाराज
फलटण संस्थानचे अधिपती
ता० ११ सप्टेंबर १८९६

नं.१०



सर दोराबजी टाटा
कोट्यवधि रुपयांचा व्यापार
करणारे

नं.११



मेजर हिज हायनेस महाराजा
सर जिवाजीराव शिंदे अलिजा-
बहादर ग्वालेर सरकार
ता. २६ जून १९१६

नं.१२



प्रेसिडेंट रुझवेल्ट,अमेरिका
ता० २१ जानेवारी १८८२
न्यूयार्क सायंकाळीं ८ वाजतां

नं.१३



श्रीमंत दानशूर शेट मुकुंद-
रावजी दादाजी राणे
(मॅ. दादाजी धाकजी अन्ड कंपनी
लि. मुंबई) ता. ५ आगष्ट १८९५
रात्रीं १० वाजून ४८ मिनिटें

नं.१४



श्रीमंत सौ० गुलाबबाईसाहेब
मुकुंदरावजी राणे
डायरेक्टर मे. दादाजी धाकजी
ॲन्ड कंपनी लि. मुंबई

नं.१५



महाराष्ट्रशिरोमणि नेक नामदार
डॉ. मुकुंदराव ऊर्फ बाबासाहेब
जयकर
शके १७९५ कार्तिक कृष्ण ९

नं.१६

सुभाषचंद्र बोस
शके १८१८ पौष वद्य ५
इ. घ. ५ प. ८

नं.१७



डॉ. रामकृष्ण हरी भडकमकर
ता. ७ फेब्रुवारी १८८४

नं.१८



श्रीमंत प्रतापशेट ऊर्फ मोतिलाल
माणिकचंद
ता० ११ डिसेंबर १८७९
अमळनेर

नं.१९



श्रीयुत अण्णा वाबाजी लठ्ठे
ता. १९ डिसेंबर १८७७

नं.२०

बॅरिस्टर अनंतराव हरी ऊर्फ
बाळासाहेब खाजगीवाले.
ता० २७ सप्टेंबर १९०१

नं.२१



श्रीमंत सर हुकूमचंदजी बँकर
इंदूरचे कोट्याधीश
जन्म ता. १६ जून १८७४
दुपारीं स्टॅ. टा. ११ वा. ५५ मिनिटें

नं.२२



श्रीमंत सर यशवंतराव होळकर
इंदूर संस्थानचे अधिपती
ता० ६ सप्टेंबर १९०८

नं.२३



श्रीमंत सयाजीराव महाराज
गायकवाड बडोदेंसंस्थानाधिपति
ता० ११ मार्च १८६३

नं.२४



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक
ता० २३ जुलै १८५६

नं.२५



स्वराज्यसंस्थापक छत्रपती
शिवाजी महाराज
ता. १९ फेब्रुवारी १६३०

नं.२६

हिंदुस्थानच्या राष्ट्रीय सभेची
अर्थात्
काँग्रेसची जन्मकुंडली
ता. २८ डिसेंबर १८८५
दिवसा १२ वाजतां

नं.२७



वॅ. विनायक दामोदर सावरकर
ता. २८ मे १८८३
रात्रौ ९ वा. २१ मि.

नं.२८



पंडित जवाहरलाल नेहरू
ता. १४ नोव्हेंबर १८८९

लोकशाही स्वराज्यपक्ष
स्थापना ता. २९ आक्टोबर
१९३३ मुंबई दुपारीं ३ वाजतां

नं.२९



श्री. पंतप्रतिनिधि भवानराव ऊर्फ बाळासाहेब चीफ ऑफ औंध.
ता. २४ आटोबर १८६८

नं.३०



आचार्य प्रल्हाद केशव अत्रे
ता. १३ आगष्ट १८९८
सकाळीं ७ वाजून ५० मिनिटें.
(अत्रे चित्र मुंबई)

नं.३१



श्री. दामोदर रामचंद्र जोशी.
ता. ४ मार्च १८९३
रात्रीं ९ वाजून ३२ मिनिटें
(बालमोहन संगीत नाटक मंडळी)

नं.३२



नं.३३



श्रीयुत व्ही. शांताराम
ता. १८ नोव्हेंबर १९०१
(राजकमल चित्र, मुंबई)

नं.३४



मास्टर विनायक
ता. १९ जानेवारी १९०६
रात्रीं ९ वाजून १५ मिनिटें
(प्रफुल्ल पिक्चर कोल्हापूर)

नं.३५



सौ. सुशीलाबाई ऊर्फ वनमाला
ता. २२ मे १९१५

नं.३६



मिस् सुलोचना पालकर
ता. ९ आक्टोबर १९१३

श्रीसद्गुरु नारायण महाराज
संस्थान बेट
ता. २० मे १८८५

नं.३७



हरिभक्त गोसेवक
बाळकृष्ण मार्तंड चौंडे
ता. १ फेब्रुवारी १८७७

नं.३८

श्रीयुत नारायणराव राजहंस
बालगंधर्व
ता. २६ जून १८८८

नं.३९



सरदार रावबहादूर
विठ्ठलराव लक्ष्मणराव ठुबे

नं.४०



नं.४१



श्रीमंत अनंत गणेश
उर्फ मामासाहेब गद्रे
ता. २७ ओक्टोबर
(मा. डेक्कन प्रिंटीग वर्क्स)

नं.४२



श्रीमंत दानशूर चंद्रशेखर
आगाशे. वृहन्महाराष्ट्र सिंडिकेट
शके १८०९ फाल्गुन शु. ३

नं.४३



श्रीमंत वासुदेव लक्ष्मण
उर्फ काकासाहेब लिमये
म्युनिसिपल कौन्सिलर, पुणें

नं.४४



श्रीमंत गजानन महेश्वर
उर्फ नानासाहेब गुप्ते
ता. २० मे १९००
बी. ए. एल एल बी.

नं. ४५



श्रीमंत शेट कांतिलाल
मगनलाल पारेख
ता. ८ डिसेंबर १९१४
व्यापारी

नं. ४६

श्रीमंत शेट काशिनाथ गणपत
उर्फ बाबूराव पानवकर
ता. १ फेब्रुवारी १९०९
व्यापारी

नं. ४७



श्रीमंत माणिकचंद दौलतराम
वोरा मिरजगांव (नगर)
शके १८१६ वैशाख शु. २
व्यापारी

नं. ४८



श्रीमंत शेट शांतिलाल
मगनलाल पारेख
ता. ३ मे १९१८
व्यापारी

नं. ४९



श्रीयुत एम. आर. रुबेन साहेब
रेशनिंग ऑफिसर पुणें.
ता. ११ जून १८९२
रात्रीं १ वाजून १० मिनिटें

नं. ५०



श्री. व्यंकटेश हणमंत जाना
म्युनिसिपल कौन्सिलर पुणें
म्यु. स्कूलबोर्ड चेअरमन
ता. ४ जानेवारी १९१०

नं. ५१

श्रीयुत फुलचंद पुरुषोत्तम शाहा
ता. २२ आक्टोबर १९०९
व्यापारी

नं. ५२



श्रीयुत हरीभाऊ मारुती वाघिरे
म्युनिसिपल कौन्सिलर पुणें
व्यापारी
ता. १८ ऑक्टोबर १९०५

नं.५३



बाबू राजेंद्र प्रसाद
ता. ३ डिसेंबर १८८४

नं.५४



श्रीमद्जगद्गुरु शंकराचार्य
पीठ संकेश्वर
स्वामी शिरोळकर महाराज
ता. ९ मार्च १८७५

नं.५५



मो. धोंडो केशव कर्वे
१८ एप्रिल १८५८

नं.५६

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे
२३ एप्रिल १८७३

नं. ५७

श्री. गोपाळ कृष्ण ऊर्फ बाबासाहेब देवधर
ता. ७ जुलै १८७०
संस्थापक सेवासदन सोसायटी
पुणें

नं. ५८



श्री. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर
ता. २५ आगष्ट १८७२
लग्न कर्क

नं. ५९



श्री. ज. स. ऊर्फ तात्यासाहेब करंदीकर
संपादक केसरी
ता. १५ फेब्रुवारी १८७५

नं. ६०



मुद्रणकलानिधि श्री. शंकर रामचंद्र ऊर्फ मामासाहेब दाते
ता. २८ सप्टेंबर १८९८

नं.६१



श्री. ना. भि. परुळेकर
ता. ३ जून १८९७

नं.६२



भारताचार्य चिंतामणराव वैद्य
ता. १८ आक्टोबर १८६१

नं.६३



मा. मनहर गणपत बर्वे
ता. २० डिसेंबर १९१०
गायनवादनपटु

नं.६४



श्री. गोपाळराव विनायक भोंडे
महाराष्ट्रांतील प्रसिद्ध नकलाकार
३१ आक्टोबर १८८१

नं. ६५



प्रो. दत्तो वामन पोतदार
५ आगस्ट १८९०

नं. ६६

परलोकविद्याविशारद
श्री. वि. दा. ऋषि.
ता० ७ नोव्हेंबर १८८६

नं. ६७



श्री. वि. ग. ऊर्फ दादासाहेब
केतकर
अनाथविद्यार्थीगृहाचे कुलगुरु.
ता० ९ एप्रिल १८८७

नं. ६८



श्री. गणेश रामचंद्र साठे
ता० ११ सप्टेंबर १८९९
साठे बंधू बिस्किट कारखान्याचे
मालक.

नं.६९



श्री. सदाशिवराव शुक्ल
नाटककार, कवि, लेखक.
नोकरी न करितां साहित्यावर
हजारों रुपये मिळविले.

नं.७०

श्री. के. एम. मोदी
ता० १० सप्टेंबर १८९९
(वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि.)

नं.७१

श्रीमंत शेट मुरलीधर
चतुर्भुज लोया.
जन्म.ता० २६ फेब्रुवारी १९०८

नं.७२



श्री. कृ. ग. ऊर्फ काकासाहेब
लिमये
ता० १५ आगष्ट १८९२
सकाळी सुमारें ११॥ वाजतां.

नं.७३

श्रीछत्रपति पांचवे शिवाजी-
महाराज कोल्हापूर.
ता० २२ नोव्हेंबर १९४१
रात्रौ २ वाजून ३१ मिनिटें
जन्म गांव (मंगसुळी)

नं.७४

राजकवि यशवंतरावजी
पेंढरकर.
ता० ९ मार्च १८९९

नं.७५



रँगलर परांजपे.
ऑस्ट्रेलियाचे
हायकमिशनर

नं.७६



प्रो.श्रीपाद महादेव माटे.
ता० ३१ आगष्ट १८८६
सकाळीं ८ वाजतां

महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचे संपादक
डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर.
ता० ३० जानेवारी १८८४

नं.७७

देवी सरोजनी नायडू.
शके १८०० माघ शु. ७

नं.७८

राणीच्या जाहिरनामा
हिंदुस्थान.
१ नोव्हेंबर १८५८

नं.७९



श्री. कृष्णाजी प्रभाकर
खाडिलकर.
ता० २५ नोव्हेंबर १८७२

नं.८०



नं.८१

श्री. अनंत गणेश ऊर्फ बाबुराव
श्रोत्री इनामदार
शके १८१९ कार्तिक शु. ५



नं.८२

श्री. लक्ष्मण बळवंत ऊर्फ
आण्णासाहेब भोपटकर
ता० ११ मे १८८०



नं.८३

पंडित मदनमोहन मालवीय
ता० २५ डिसेंबर १८६१

नं.८४

वॅरिस्टर जमनादास मेहता.
ता० २ आगष्ट १८८४

नं.८५



होराभूषण ग. प्र. दीक्षित

ता० ४ एप्रिल १८८६

नं.८६



श्री. यशवंत केशव प्रधान.

ता० ४ एप्रिल १८८६

नं.८७



ज्योतिषाचार्य पंडित रघुनाथ-
शास्त्री पटवर्धन.

नं. ८८



ज्योतिषी श्रीवल्लभ दत्तात्रेय
अवचट उर्फ सवाई म्हापणकर

ता० १८ जून १९०५

नं.८९

रावबहादूर ना. ए. नवले.
ता० १२ फेब्रुवारी १८९४
अहमदनगर

नं.९०

श्रीमंत शेट दानशूर गंगाराम
छबिलदास येवला.
ता० १५ सप्टेंबर १८७४

नं.९१

श्री. यशवंत गोपाळ जोशी.
लेखक व ग्रंथप्रकाशक
शके १८२३ मार्गशीर्ष शु. ७

नं.९२



श्री. दिगंबर परशुराम ऊर्फ
भव्यासाहेब गोडबोले.
शके १८२३ श्रावण शु. ७
इ. घ. ३२. प. १७.

नं.९३



श्री. त्र्यं. र. ऊर्फ मामासाहेब
देवगिरीकर.
विश्वस्त चित्रशाळा पुणें.
२५ नोव्हेंबर १८९६

नं.९४



श्री. रा. प्र. कानिटकर.
संपादक चित्रमय जगत् पुणें.
ता० २७ जानेवारी १९०५

नं.९५



श्री. मधुसूदन दिनानाथ दळवी.
चीफ ऑफिसर पुणें नगरपालिका
ता० १६ मे १८९०
सूर्योदयाबरोबर.

JAGADGURU VISHWARADHYA
NA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
ngamawadi Math, Varanasi
c. No. ..... 3743 .....

नं.९६



श्री. न. वि. गाडगीळ.
ता० १० जानेवारी १८९६.
सायंकाळी सूर्यास्ताबरोबर

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY.
Jangamwadi Math, VARANASI,
Acc. No. 6068
3743



अनिष्ट ग्रह निवारणार्थ दैवी योजना

सूर्यग्रहणांत मंतरलेले

अश्वनाल

शनि अनिष्ट असतां
अश्वनाल जवळ ठेवा.
फक्त दर शनिवारींच
मिळतात.

भालचंद्र
ज्योतिर्विद्यालय,
६०९ सदाशिव पुणें २.

भालचंद्र ज्योतिर्विद्यालय, पुणें

(१) शिक्षण-विभाग

आर्य-आँग्ल पद्धतीनें ज्योतिषविषयक शिक्षण दिलें जातें.

(२) भविष्यकथन-विभाग

सर्व प्रकारचीं ज्योतिषविषयक कामें काळजीपूर्वक केलीं जातात.

(३) सामुद्रिक-विभाग

हस्त-सामुद्रिक शिकविलें व प्राहिलें जातें.

(४) दैवी-विभाग

अनिष्ट ग्रहनिवारणार्थ निरनिराळ्या उपाययोजना सांगण्यांत येतात व केल्या जातात.

(५) लेखन-विभाग (६) ग्रंथ-विभाग (७) चर्चा-विभाग.

आपला संपर्कियोग विद्यालयाला भेट देऊन अवश्य पाहा.

भालचंद्र ज्योतिर्विद्यालय

६०९ सदाशिव पेठ, पुणें २.